cmyk

## संपादकीय

### लालफितीच्या युगाचा शेवट ?

राज्याच्या जमीन महसूल कायद्यात करण्यात आलेला अलीकडचा बदल हा केवळ प्रशासकीय दुरुस्ती नसून शासनव्यवस्थेच्या मानसिकतेत झालेला बदल म्हणून पाहिला गेला पाहिजे. बिगरकृषी (एनए) वापरासाठी स्वतंत्र परवानगी घेण्याची सक्ती रद्द करणे आणि अकृषिक कर कायमचा हटवणेया दोन निर्णयांमुळे महसूल प्रशासन, गृहनिर्माण क्षेत्र, बँकिंग व्यवस्था आणि सर्वसामान्य जमीनमालक यांच्यातील संबंधांचे स्वरूपच बदलण्याची क्षमता आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२८७ शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### 'बॉर्डर २' वरून वाद

मोहाली: काही दिवसांपुर्वी प्रदर्शित झालेली 'बॉर्डर–२' चित्रपट जरी धुमाकूळ घालत असला तरी, १९९७ मध्ये आलेल्या 'बॉर्डर' चित्रपटाचा वाद थांबलेला नाही, ज्यात लोंगेवालाची लढाई दाखवण्यात आली आहे. या युद्धात सहभागी असलेले मोहालीचे हवालदार मुख्तियार सिंह यांचा दावा आहे की मोर्चावर १२० भारतीय जवानांनी हजारो पाकिस्तानी सैनिक आणि रणगाड्यांचा जोरदार मुकाबला केला आणि फक्त ३ जवान शहीद झाले होते, तर चित्रपटात जवळजवळ सर्वांना शहीद दाखवण्यात आले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, वास्तविक इतिहास चुकीच्या पद्धतीने सादर करण्यात आला, ज्यामुळे त्यांना दु:ख झाले आहे. ते या प्रकरणी २ वर्षांपासून राजस्थानचे मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री आणि पंतप्रधानांना पत्रे लिहित आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, सनी देओलकडून त्यांची हीच अपेक्षा आहे की, जर काही करू शकत नसतील, तर किमान त्या युद्धात जिवंत राहिलेल्या सैनिकांना भेटावे. आम्ही त्या मोर्चाचे खरे नायक आहोत, पण आम्हाला कोणी विचारत नाही, अशी त्या जवानांची तक्रार आहे.

### मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग कधी पूर्ण होणार

मुंबई: गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु होऊन १५ वर्षे झाली तरी अद्याप हा महामार्ग पूर्ण झालेला नाही. भाजपा सरकार केवळ मोठमोठ्या घोषणा करते पण कोणताच प्रकल्प पुर्ण करत नाही व जनतेच्या पैशाची उधळपट्टी करत आहे. एक महामार्ग बनवण्यास एवढी वर्षे लावून सरकार कंत्राटदारांचे खिसे भरत आहेत का? असा सवाल काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी लोकसभेत विचारला. मुंबईला देशातील प्रमुख शहरांना जोडणाऱ्या महामार्गांच्या प्रश्नी खासदार वर्षा गायकवाड यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित करत म्हणाल्या की, दिल्ली–मुंबई एक्सप्रेस वे, मुंबई–नागपूर समृद्धी महामार्ग आणि मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) मुंबईला दिल्ली, नगर, पुणे आणि गोवा यासारख्या प्रमुख शहरांशी जोडणाऱ्या या प्रकल्पांमध्ये वारंवार विलंब होत असून खर्च वाढत आहे. हे प्रकल्प कधी पूर्ण होणार याबाबत सरकारकडे काही निश्चित रोडमॅप आहे का, या प्रकल्पांना होत असलेल्या विलंबामुळे मुंबई महानगर प्रदेशातील मालवाहतूक, बंदर कनेक्टिव्हिटी आणि दैनंदिन प्रवाशांवर परिणाम झाला आहे.

### रणवीरच्या स्टाफला बिश्नोई गँगनं दिली नवी धमकी

मुंबई: बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह याला शुक्रवारी (दि. १३) पुन्हा एकदा बिश्नोई गँगकडून धमकी मिळाली आहे. या धमकीत त्यांनी ते फक्त रणवीर सिंहलाच नाही तर पूर्ण स्टाफला देखील टार्गेट करणार असल्याचे म्हटले आहे. बिश्नोई गँगशी संबंधित असलेल्या एका अनोळखी व्यक्तीनं याबाबतची व्हॉईस नोट पाठवली आहे. या व्हॉईस नोटमध्ये संबंधित व्यक्ती हा, शब्द न पाळण्याची शिक्षा काय असते हे तुला आता सांगणार. असे म्हणताना दिसत आहे. याचबरोबर संबंधित अनोळखी व्यक्ती हा रोहित शेट्टीचा देखील उल्लेख करताना दिसतो. तो म्हणतो, लाईनवर या, जर आला नाही तर मग पाहा आम्ही लोक काय करू शकतो. रणवीर सिंह आणि दीपिका पदुकोन यांना एका दिवसापूर्वीच धमकी आली होती. त्यानंतर त्यांनी आपली सुरक्षा वाढवली होती. मुंबईतील त्यांच्या घराबाहेर देखील सुरक्षा वाढवण्यात आली होती.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.०० क्विंटल | २,१५१ | ३,४५० | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड :२७.०० क्विंटल | २,३०० | ४,३५१ | ३,५०५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ९.०० क्विंटल | ७,२०१ | ७,८५० | ७,६७४ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,०५० | ३,११६ | २,७३७ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,५०० | ५,२०० | ४,७६६ |

# केंद्राकडून २५ लाख टन गहू निर्यातीला मंजुरी

## साखरेचा कोटाही वाढवला, निर्यात होणार



**दिल्ली । वृत्तसंस्था**

**केंद्र सरकारने २५ लाख टन गहू आणि ५ लाख गहू पदार्थांच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. तसेच साखर निर्यातीचा कोटाही ५ लाख टनांनी वाढवला आहे. देशात पुरेसा साठा असल्याने आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकारचे म्हणणे आहे.**

केंद्र सरकारने मे २०२२ मध्ये सरसकट गहू निर्यातीवर बंदी घातली होती. त्यानंतर काही देशांना कोटा देऊन निर्यातीला परवानगी दिली आहे. आता शुक्रवारी (ता.१३) केंद्राने २५ लाख टन गहू निर्यातीला परावनगी दिली. शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्यातीला परवानगी दिल्याचे सांगात निर्यातीचा देशातील बाजारावर परिणाम होणार नाही, असेही सरकारने म्हटले आहे. देशात गव्हाचा पुरेसा साठा आहे. देशातील व्यापारी, प्रक्रियादार आणि विक्रेत्यांकडे ७५ लाख टनांच्या दरम्यान गव्हाचा साठा आहे. गेल्यावर्षीपेक्षा हा साठा जास्त आहे. भारतीय अन्न महामंडळाकडे १ एप्रिलला १८२ लाख टन साठा राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे निर्यातीचा भावावर परिणाम होणार नाही. देशात पुरवठा चांगला आहे. देशातील गव्हाचे भाव स्थिर राहावे यासाठी २५ लाख टन गहू आणि ५ लाख टन गहू पदार्थांच्या निर्यातीला परवानगी देण्यात आली आहे. देशातील शेतकरी गव्हाचे उत्पादन वाढवत असून हमीभावानेही खरेदी चांगली होत आहे, हेच यातून स्पष्ट होत असल्याचाही दावा सरकारने केला आहे. केंद्र सरकारने साखर निर्यातीच्या कोट्यातही ५ लाख टनांची वाढ केली आहे. यापुर्वी साखर हंगाम २०२५–२६ मध्ये सरकारने १५ लाख टन साखर निर्यतीला परवानगी दिली होती. यापैकी


▶▶ पान २ वर

# कोळसा घोटाळा प्रकरणी 'ईडी'ची मोठी कारवाई!

## तब्बल १०० कोटींपेक्षाही अधिकची मालमत्ता जप्त

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बेकायदेशीर कोळसा खाणकाम प्रकरणात मोठी कारवाई करत, तब्बल १००.४४ कोटी रुपयांची मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. मनी लाँडरिंग कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणात ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (ईसीएल) च्या लीज क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर खाणकाम आणि कोळसा चोरीचा समावेश आहे.**



याआधी ८ जानेवारी २०२६ रोजी ईडीने कोलकाता आणि दिल्लीतील १० ठिकाणी छापे टाकले होते. या छाप्यांमध्ये सापडलेल्या पुराव्यांच्या आधारेच आता या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. तपासात असे दिसून आले आहे की, हे संपूर्ण रॅकेट अनुप मांझी उर्फ लाला यांच्या नेतृत्वाखालील सिंडिकेट चालवत होते. असा आरोप आहे की या सिंडिकेटने मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे कोळसा उत्खनन केला आणि नंतर तो पश्चिम बंगालमधील अनेक कारखान्यांमध्ये पोहोचवला. या कारवाईत स्थानिक प्रशासनाचा सक्रिय सहभाग असल्याचेही तपासात समोर आले आहे. ईडीच्या तपासात असेही उघड झाले की स्टील आणि लोह क्षेत्रातील काही कंपन्यांनी बेकायदेशीर कोळसा रोखीने खरेदी केला. यामुळे त्यांना त्यांची बेकायदेशीर कमाई दाखविण्यास मदत झाली. जप्त केलेल्या

▶▶ पान २ वर

# लाचखोर सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर!

## मंत्रालयात कारकूनाने लाच घेतल्याप्रकरणी मंत्री झिरवाळांनी राजिनामा द्यावा ; काँग्रेसची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या घटनेमुळे राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगल्या गेल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या घटनेच्या निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.



मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारकून राजेंद्र ढेरंगे यांना ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तात्काळ राजीनामा देऊ अशी भूमिका स्पष्ट केली आहे. पण राजेंद्र ढेरंगे यांनी झिरवाळ यांचे स्विय सहाय्यक रामदास गाडे यांच्या सूचनेनुसारच ही लाच घेतल्याचा दावा केला आहे. यामुळे झिरवाळ यांच्या अडचणींत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी

▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांना पीएम किसानचा २२ वा हप्ता मिळणार नाही

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्वाची माहिती आहे. मंत्रालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, देशभरातील ३,०१८,३६१ शेतकऱ्यांची बँक खाती ६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत त्यांच्या आधारशी लिंक केलेली नाहीत. या शेतकऱ्यांच्या खात्यात पंतप्रधान किसान योजनेचा २२ वा हप्ता जमा होणार नाही.

तुमचे बँक खाते आधारशी लिंक करणे अनिवार्य आहे, अन्यथा तुम्हाला पीएम किसान योजनेचा २२ वा हप्ता मिळणार नाही. मंत्रालयाने शेतकऱ्यांची राज्यवार यादी जारी केली आहे.

▶▶ पान २ वर

# राज्यातील बोगस दिव्यांग संस्थांवर टाच !

## ९०० संस्थांची नोंदणी रद्द; आयुक्त तुकाराम मुंढे यांची धडक कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात साधारणत: २ हजारांहून अधिक संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत होत्या. मात्र यापैकी सुमारे ९०० संस्थांची नोंदणी विविध कारणांमुळे रद्द केली आहे. विशेष म्हणजे सन २०२५ या वर्षातच ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

राज्यात दिव्यांग व्यक्तींच्या हक्क, सक्षमीकरण आणि पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या सर्व संस्थांसाठी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० अन्वये आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्याकडे नोंदणी करणे अनिवार्य आहे. संस्था सोसायटी नोंदणी कायदा,१८६०; बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा,१९५० किंवा कंपनी कायदा (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असल्यानंतरसुद्धा , दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० अंतर्गत नोंदणी अनिवार्य आहे. त्यामुळे शासनाचा निधी योग्य संस्थांवर खर्च होईल. ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत किंवा कार्य करू इच्छितात. त्यांनी दिव्यांग

▶▶ पान २ वर

# माझ्याशी संबंध सिद्ध झाले तर राजीनामा देईन - मंत्री झिरवाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापा टाकत दोन कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणात कार्यालयातील कारकून राजेंद्र ढेरंग याने ५० हजार रुपयांची लाच मागून त्यातील ३५ हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. या कारवाईनंतर आता मंत्री नरहरी झिरवाळ यांनी या संपूर्ण प्रकरणावर आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ सध्या दिल्ली दौऱ्यावर असून, तेथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. एसीबीच्या कारवाईबाबत प्रतिक्रिया देताना झिरवाळ म्हणाले, मी मागील दोन दिवसांपासून दिल्लीत आहे.

▶▶ पान २ वर

# पंतप्रधान यांनी केले तीर्थ संकुलातील नव्या पीएमओचे उद्‌घाटन

**दिल्ली । वृतसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (१३ फेब्रुवारी २०२६) सेवा तीर्थ संकुलाचे उद्घाटन केले, ज्यामध्ये पंतप्रधान कार्यालय (पीएमओ), राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय असेल.**

पंतप्रधान मोदींनी नवीन संकुलात सेवा तीर्थच्या फलकाचे अनावरण केले संकुलाच्या भिंतीवर देवनागरी लिपीत लिहिलेले नाव. त्याखाली 'नागरिक देवो भव'

▶▶ पान २ वर




# महिला उद्योजकांसाठी पर्यटन विभागाची 'आई' योजना

## १५ लाखांपर्यंत कर्जावर व्याज परतावा

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

पर्यटन क्षेत्रात महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पर्यटन विभागाने सुरू केलेली महिला–केंद्रित 'आई' पर्यटन योजना ही महिलांसाठी सुवर्णसंधी ठरणार असल्याचे प्रतिपादन पर्यटन संचालनालयाच्या उपसंचालक डॉ. प्रज्ञा मनोहर यांनी केले.

▶▶ पान २ वर




# राज्यात 'आरटीई'अंतर्गत शाळा, प्रवेशाच्या जागांमध्ये घट

## अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेने केली चौकशीची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेंतर्गत गेल्या नऊ वर्षांत ३२५ शाळा, १३ हजार २५५ जागा कमी झाल्या आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आर्थिक मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश जागा कमी होत आहेत. अनेक शाळा अल्पसंख्याक दर्जा प्राप्त करून घेत असल्याने भाषिक अल्पसंख्याक दर्जा घेतलेल्या शाळांतील ५१ टक्के विद्यार्थी 'त्या भाषिक अल्पसंख्याक' गटातील आहेत का, याबाबत चौकशी करण्याची मागणी अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेने केली आहे.**




राज्यातील आर्थिक दुर्बल आणि वंचित गटातील विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतो. त्यासाठी प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२६–२७साठी आरटीईअंतर्गत शाळानोंदणी आणि पडताळणीची प्रक्रिया ९ जानेवारीपासून सुरू करण्यात आली. त्यात ८ हजार ६५३ शाळांनी नोंदणी केली आहे, तर १ लाख १२ हजार ७५१ जागा प्रवेशांसाठी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र, अद्याप विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर, आरटीई २५ टक्के आरक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेतून अनेक विनाअनुदानित शाळा बाहेर पडत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे

▶▶ पान २ वर

### "प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू करा–जावडेकर

राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभागाच्या १३ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार विनाअनुदानित धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक शाळांनी किमान ५१ टक्के प्रवेश त्यांना प्राप्त झालेल्या दर्जाच्या गटातूनच भरावेत, उर्वरित जागा इतर गटांतून भराव्यात असे म्हटले आहे. त्यानुसार भाषिक अल्पसंख्याक शाळांमध्ये ५१ टक्के विद्यार्थी 'त्या भाषिक अल्पसंख्याक' गटातील आहेत का, याबाबत चौकशी करण्याची मागणीही डॉ. जावडेकर यांनी केली. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची आरटीई प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी. दरवर्षी खासगी विनाअनुदानित शाळा प्रामुख्याने आरटीई प्रवेश प्रक्रियेबाबत नकारात्मक भूमिका घेतात. त्यामुळे पालकांमध्ये अस्वस्थता आणि भीती निर्माण होते. या संदर्भात शासनाने कायमस्वरूपी उपाय योजले पाहिजेत असे सुरेखा खरे यांनी नमूद केले.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# लालफितीच्या युगाचा शेवट ?

राज्याच्या जमीन महसूल कायद्यात करण्यात आलेला अलीकडचा बदल हा केवळ प्रशासकीय दुरुस्ती नसून शासनव्यवस्थेच्या मानसिकतेत झालेला बदल म्हणून पाहिला गेला पाहिजे. बिगरकृषी (एनए) वापरासाठी स्वतंत्र परवानगी घेण्याची सक्ती रद्द करणे आणि अकृषिक कर कायमचा हटवणेया दोन निर्णयांमुळे महसूल प्रशासन, गृहनिर्माण क्षेत्र, बँकिंग व्यवस्था आणि सर्वसामान्य जमीनमालक यांच्यातील संबंधांचे स्वरूपच बदलण्याची क्षमता आहे. दीर्घकाळापासून किचकट, वेळखाऊ आणि त्रासदायक ठरलेली प्रक्रिया एका झटक्यात सुलभ करण्याचा शासनाचा प्रयत्न हा नक्कीच सकारात्मक दिशेने टाकलेला पाऊल मानावा लागेल.

जमिनीचा वापर कृषीवरून बिगरकृषीकडे वळवण्यासाठी स्वतंत्र एनए परवानगी घ्यावी लागणे ही केवळ औपचारिकता नव्हती; ती एक प्रशासकीय चक्रव्यूहच होता. जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभाग, तलाठी, मंडळ अधिकारी, विविध प्रमाणपत्रे, नकाशे, मोजमाप, अधिसूचनाया सगळ्या टप्प्यांतून सामान्य माणसाला जावे लागे. फाइलांची हालचाल महिनोन्महिने सुरू राहत असे. प्रत्येक टप्प्यावर अनिश्चितता, विलंब आणि खर्च वाढत असे. ''सरकारी काम आणि सहा महिने थांब'' ही म्हण याच अनुभवातून समाजमानसात घर करून बसली. या प्रक्रियेत पारदर्शकतेपेक्षा अनिश्चिततेलाच अधिक स्थान होते. नियम जरी स्पष्ट असले तरी त्यांची अंमलबजावणी कशी आणि किती वेळात होईल, याची खात्री नसे. परिणामी मध्यस्थ, दलाल आणि तथाकथित सल्लागार यांचे महत्त्व वाढले. प्रक्रिया जितकी क्लिष्ट, तितका भ्रष्टाचाराचा धोका अधिकहे प्रशासनशास्त्राचे साधे तत्त्व आहे. शासनाच्या नव्या निर्णयामुळे हा गुंता मोठ्या प्रमाणात सुटण्याची शक्यता आहे. अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय हा विशेषतः शहरी आणि निमशहरी भागातील गृहनिर्माण संस्थांसाठी मोठा दिलासा आहे. अनेक निवासी इमारती चार-पाच दशकांपूर्वी उभारल्या गेल्या असतानाही दरवर्षी हा कर भरावा लागत होता. घरपट्टी, पाणीपट्टी, वीजदर, मालमत्ता कर अशा विविध आकारांच्या जोडीला अकृषिक कर हा अतिरिक्त बोजा ठरत होता. काही वर्षांपूर्वी या करात वाढ झाल्याने तो अधिकच जाचक झाला होता. या कराच्या स्वरूपावर अनेक वेळा प्रश्न उपस्थित झाले. गृहनिर्माण संस्था आणि संघटनांनी याविरोधात आवाज उठवला. तरीही वर्षानुवर्षे ही वसुली सुरूच राहिली. आता तो कर कायमचा रद्द करण्याचा निर्णय म्हणजे केवळ आर्थिक दिलासा नव्हे, तर शासनाने लोकभावनेची दखल घेतल्याचेही द्योतक आहे. घरखर्चाचा ताळमेळ बसवताना दरवर्षीचा हा अतिरिक्त भार आता कमी होणार आहे. यापुढे बांधकाम परवानगी मिळाल्यास तीच एनए मंजुरी मानली जाणार आहे. यामुळे दोन वेगवेगळ्या कार्यालयांत अर्ज करण्याची आवश्यकता उरणार नाही. नियोजन प्राधिकरणाकडून मंजुरी घेतल्यानंतर महसूल विभागाची स्वतंत्र परवानगी घेण्याची सक्ती नसल्याने प्रकल्पांना गती मिळेल. बांधकाम क्षेत्रातील वेळेचा आणि पैशाचा अपव्यय कमी होईल. रिअल इस्टेट क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे इंजिन मानले जाते. या क्षेत्रातील सुलभता म्हणजे रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि स्थानिक अर्थचक्राला चालना. प्रक्रिया सुलभ झाल्यास लहान-मोठ्या विकासकांना संधी मिळेल. प्लॉट आणि घरांच्या किंमतींवरही सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. कारण अनावश्यक शुल्क आणि विलंब यांचा खर्च शेवटी ग्राहकांवरच टाकला जातो. बँकिंग क्षेत्रासाठीही हा निर्णय महत्त्वाचा आहे. अकृषिक सनद सादर करण्याची अट नसल्याने कर्जमंजुरी प्रक्रिया अधिक वेगवान होऊ शकते. गृहखरेदीदारांना जलद आर्थिक सहाय्य मिळेल. यामुळे घरबांधणी आणि गृहखरेदीची प्रक्रिया अधिक सुलभ होईल. सुलभतेसोबत जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. जमीन रूपांतरण प्रक्रिया वेगवान झाली तरी अनियंत्रित आणि बेकायदेशीर बांधकामांना वाव मिळू नये, याची खबरदारी घ्यावी लागेल. पर्यावरणीय नियम, जलस्रोतांचे संरक्षण, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत सुविधा यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. अन्यथा अल्पकालीन सुलभतेचा दीर्घकालीन शहरी अराजकतेत रूपांतर होण्याचा धोका असतो. महसूल आणि नियोजन विभागांमध्ये समन्वय अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. ऑनलाईन प्रणाली, वेळेची निश्चित मर्यादा, पारदर्शक शुल्क संरचना आणि तक्रारनिवारण यंत्रणाया सर्वांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यासच हा निर्णय खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल. नियम बदलणे सोपे असते; परंतु मानसिकता बदलणे आणि अंमलबजावणी काटेकोरपणे करणे हे अधिक आव्हानात्मक असते. शासनाचा हा निर्णय नागरिककेंद्री दृष्टिकोन स्वीकारण्याचे उदाहरण ठरू शकतो. प्रशासन हे जनतेसाठी असते, जनता प्रशासनासाठी नाहीही भूमिका प्रत्यक्ष कृतीतून दिसणे महत्त्वाचे आहे. जमीनमालक, गृहनिर्माण संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या दैनंदिन आयुष्यातील अडथळे दूर करणे हेच सुशासनाचे खरे मोजमाप आहे. सरकारी आदेशांची भाषा सुलभ करणे, जनजागृती करणे आणि स्थानिक अधिकाऱ्यांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना देणे ही पुढील पायरी ठरली पाहिजे. अन्यथा कागदोपत्री सुलभता आणि प्रत्यक्ष व्यवहारातील गुंतागुंत यातील दरी कायम राहू शकते. राज्य सरकारने जमीन महसूल कायद्यात केलेला हा बदल हा प्रशासनातील लालफितीला आळा घालण्याचा आणि पारदर्शकतेकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न आहे. आर्थिक दिलासा, प्रक्रियेतील वेग आणि भ्रष्टाचाराला आळाया तिन्ही आघाड्यांवर तो सकारात्मक परिणाम घडवू शकतो. मात्र या निर्णयाची खरी ताकद अंमलबजावणीत आहे. जर सुलभतेसोबत शिस्त, वेगासोबत पारदर्शकता आणि विकासासोबत नियोजनशिस्त राखली गेली, तर हा बदल राज्याच्या शहरी आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा देणारा ठरेल. अन्यथा तो केवळ कागदोपत्री सुधारणेत मर्यादित राहण्याचा धोकाही नाकारता येणार नाही. शासनाने घेतलेले हे पाऊल स्वागतार्ह आहे; आता त्याला सक्षम, संवेदनशील आणि जबाबदार अंमलबजावणीची जोड मिळणे हाच खरा कसोटीचा क्षण आहे.

# बीड शहरातील धार्मिक स्थळाची स्वच्छता मोहीम राबवा-गोविंद शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच सर्वांच्या नवसाला पावणारे असे बार्शी रोडवरील असलेले श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह व तसेच विविध धार्मिक कार्यक्रम सध्या सुरू आहेत तसेच येणाऱ्या १५ तारखेला हिंदू संस्कृतीतील सर्वात मोठी श्री महाशिवरात्र हा उत्सव साजरा संपूर्ण जगभरामध्ये साजरा होत आहे याच पार्श्वभूमीवर जिल्हा बीड येथील श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर महादेव या ठिकाणी देखील दिल्या चार-पाच दिवसापासून चालू असलेला प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी नियमाप्रमाणे सुरू असलेला श्री अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता व श्री महादेव सोमेश्वर यांची महापूजा श्री महाशिवरात्रीच्या पर्व काळावर मोठ्या थाटामाटा हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे या परिसरातील सर्व जो बाजूच्या परिसराची स्वच्छता मोहीम नगरपालिकेने करावी व ठिकठिकाणी बीड शहरांमध्ये पथदिवे नाही त्या ठिकाणी त्वरित लाईट पथदिवे बसवण्यात यावे तसेच संपूर्ण रस्त्याची स्वच्छता करण्यात यावी तसेच नगरपालिकेच्या वतीने त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात यावी असे विविध प्रश्न घेऊन स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे पाटील यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद यांना निवेदन दिले आहे तात्काळ सर्व बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील स्वच्छता मोहीम नगरपालिकेने राबवावी असे आव्हान देखील यावेळी देव देश धर्म या साठी सातत्याने लढणारे सर्वांचे सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे नगरपालिकेचे नगरसेवक म्हणून नगरसेवकाचे कार्य काय असते ते आता आपल्या उत्कृष्ट कार्यातून दाखवून देणारे असे उत्कृष्ट वकील एडवोकेट गोविंद शिरोळे पाटील यांनी निवेदन दिले आहे आणि नगरपालिकेला तात्काळ बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच श्री सोमेश्वर महादेव मंदिर परिसरातील स्वच्छता करण्यात यावी करण महाशिवरात्रीच्या अगोदर ही स्वच्छता व्हावी जेणेकरून येणाऱ्या भाविक भक्तांना कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता नगर परिषदेने घ्यावी असे या निवेदनात म्हटले आहे.

# बाल लैंगिक अत्याचार कायदा (पोस्को) च्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी आरोपी रामेश्वर रायभान सागडे याची कलम ३५४,३५४-ए, ३५४-डी, ३४१, ५०,६ भा.दं.वि व कलम ८ व १२ बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण अधि. २०१२ चे आरोपातून निर्दोष मुक्तता केली. थोडक्यात हकीकत अशी की, पिडीता ही आई-वडील, भावासह भाटेपुरी, ता. गेवराई येथे रहात होती व १२ वी मध्ये जयभवानी कॉलेज, गढी येथे शिक्षण घेत होती. पिडीता ही कॉलेज मध्ये जात असताना आरोपी हा पिडीतेचा पाठलाग करत असे व पिडीतेने दुसऱ्याशी लग्न केल्यास जिवे मारण्याच्या धमक्या देत होता. दि.११-०५-२०२३ रोजी सकाळी ११ वा. चे सुमारास पिडीता एकटी शेतात असताना आरोपीने वाईट उद्देशाने तिचा हात धरून, माझ्याशी लग्न कर, असे म्हणाला व तिचे सोबत लज्जास्पद कृत्य केले. पुढे प्रकरणात पोलीसांनी पिडीता व आरोपीचे चॅटींग, फोटो, मोबाईल इ.पो.स्टे. तलवडा येथील पोलीसांनी जप्त करून पंचनामा केला व आरोपीस अटक केली. पुढे मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होऊन सदर प्रकरणास स्पे.के.नं. १०१/२०२४ असा मिळाला व सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने साक्षीदार तपासण्यात आले होते. यामध्ये आरोपीचे वकील यांनी घेतलेला बचाव व त्या बचावा प्रमाणे फिर्यादी व साक्षीदार यांचा घेतलेला भक्कम असा उलटतपास या सर्व बाबींचे मा. न्यायालयाने सुक्ष्मपणे अवलोकन करून व सदर प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून आरोपी तर्फे घेण्यात आलेला बचाव खरा असल्याचे निष्पन्न झाल्याने मा. न्यायालयाने आरोपी रामेश्वर रायभान सागडे यांची सदर प्रकरणातून दि.०२-०२-२०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली आहे. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. पुजा गणेश शहाणे (पळसेकर) यांनी काम पाहिले व त्यांना सदर प्रकरणात ॲड.ए.पी. तिवारी मॅडम यांनी मोलाचे सहकार्य केले.



## पान ६ वरून...

### राष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक 'महा

पान ६ वरून...

परळीत व्हावा अशी माझी मनोमन इच्छा होती. आता हा एक्सपो आयोजित करताना मला आनंद होत आहे. हा एक्स्पो तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारा आहे असे त्या म्हणाल्या.

**मुंडे साहेबांची उणीव अन्? अजितदादांची आठवण..**

प्रत्येक कार्यक्रमात लोकनेते मुंडे साहेबांची उणीव आम्हाला जाणवते. ही त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. त्यांचे स्मरण आपल्याला सदैव होत असते, त्याच पद्धतीने आज आपल्या बीड जिल्ह्याला विकासाच्या नव्या दिशेने घेऊन जाणारे राज्याचे उपमुख्यमंत्री व आपले पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आज महा पशुधन एक्सपो बघण्यासाठी अजितदादा असते तर त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या असत्या आणि कौतुकही केले असते. तर मुंडे साहेब असते तर हे सर्व मला करावेच लागले नसते, त्यांनीच हे केले असते. परंतु दुःखाच्या प्रसंगांवर पाय देत पुढे जाण्याचे बळ ईश्वर देतो. लोकांसाठी केलेली कामेच खऱ्या अर्थाने कामी येतात. त्याच मार्गावर लोकहिताची कामे आपल्या हातून घडावी असा आपला सातत्याने प्रयत्न असल्याचे ना पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

**कृषीचा दर्जा मिळाल्याने पशुपालकांना आता सवलत**

महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा दिला. आता पशुपालकांना कर्जावरील व्याजदर कृषीप्रमाणेच मिळणार आहे. तीन लाखांपर्यंत व्याजावर अनुदान, सौरऊर्जेसाठी सबसिडी, वीज बिलात सवलत अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील.५० टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध असून एक कोटी रुपयांच्या प्रकल्पावर ५० लाखांपर्यंत सबसिडी मिळू शकते. बकरीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन अशा उद्योगांत तरुणांनी उतरावे. कमी जमिनीतही आधुनिक पद्धतीने बहुउद्देशीय शेती करता येते. या

------------

### नवगण राजुरी गावातून

व्यापारी वर्गाच्याही मते, बससेवा नियमित नसल्याने बाजारपेठेवर परिणाम होत आहे. तथापि,तालुक्याचे मुख्य ठिकाणच वंचित राहणे योग्य आहे का, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नावर लक्ष देऊन एसटी प्रशासनाशी चर्चा करण्याची गरज व्यक्त केली आहे. पाटोदा बसस्थानकात सर्व प्रमुख गाड्यांचा नियमित थांबा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.एकीकडे नवगण राजुरीत एसटींची रेलचेल, तर दुसरीकडे तालुक्याचे ठिकाण असूनही पाटोद्याची उपेक्षा ही परिस्थिती हे पाटोद्याचे भाग्य की दुर्भाग्य, याचा निर्णय आता प्रशासनानेच घ्यायचा आहे.

-----------

### आष्टीत वरिष्ठ दिवाणी

आतापर्यंत वरिष्ठ स्तरावरील दिवाणी प्रकरणांसाठी बीड किंवा इतर ठिकाणी जावे लागत होते. यामुळे वेळ, खर्च आणि मानसिक ताण वाढत होता. नवीन न्यायालय सुरू झाल्याने न्यायप्रक्रिया जलद होण्यास मदत पक्षकारांचा वेळ व आर्थिक खर्च वाचणार ग्रामीण भागातील नागरिकांना न्यायप्रवेश सुलभ वकील व्यवसायाला स्थानिक पातळीवर चालना अशा अनेक सकारात्मक परिणामांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**आष्टीच्या न्यायव्यवस्थेला नवे नेतृत्व**

दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) म्हणून सौ. अलका निवारे यांची नियुक्ती होऊन त्या आष्टीच्या पहिल्या वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश ठरल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयाची कामकाज पद्धती प्रभावी व पारदर्शक राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**वकील संघाचे आवाहन**

आष्टी वकील संघाचे अध्यक्ष सय्यद ताहेर जमाल यांनी सर्व वकील बांधव, सामाजिक संस्था, तसेच नागरिकांना या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. न्यायालयाची स्थापना ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाहीच्या बळकटीकरणाचा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी नमूद केले.

**तालुक्याच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा**

वरिष्ठ दिवाणी न्यायालयाची स्थापना ही केवळ न्यायिक सुविधा नसून आष्टी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे प्रतीक मानली जात आहे. प्रशासनिक सुविधा, न्यायव्यवस्था आणि सार्वजनिक सेवांचा विस्तार होत असल्याने आष्टी शहर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे प्रशासकीय केंद्र म्हणून उदयास येत आहे. शनिवारी होणाऱ्या या उद्घाटन सोहळ्याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून न्यायव्यवस्थेतील नवा अध्याय सुरू होण्याची सर्वांना उत्सुकता आहे.

----------

### पाटोदा येथील राज मोहम्मद चौकातील

जात आहेत. त्यामुळे या चौकात वाहतुकीची कोंडी होताना दिसत असुन यामुळे जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे योग्य ते नियोजन करून राज मोहम्मद चौक येथील वाहतुक नियंत्रणात ठेवुन जिवीत हानी टाळली जावी या करीता भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस अँड. विशाल मस्के यांनी पोलिस स्टेशन पाटोदा व नगर पंचायत पाटोदा यांना निवेदन दिले आहे, त्यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष राहुल जाधव, पत्रकार हमीदखान पठाण व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

------------

### संत भगवान बाबा शासकीय वसतिगृहासाठी

तसेच राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा ताई पवार,आणि उपमुख्यमंत्री ना. एकना शिंदे यांचे माजलगाव विधान सभेच्या वतीने आमदार प्रकाश सोळंके यांनी मन:पूर्वक आभार व्यक्त केले आहे.

-------------

### वेदशास्त्र संपन्न किरण

त्यानंतर सलग पंधरा दिवस ते कोमात होते. वैद्यकीय प्रयत्न सुरू असतानाही उपचारांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर दि.१३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी नियतीने अंतिम निर्णय घेतला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. आणि परभणी येथे दुपारी त्यांच्या पार्थ दयावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आरुण काका हे गावातील सर्वपरिचित, सर्वसमावेशक आणि विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे सामाजिक योगदान, साधेपणा आणि माणुसकी हीच त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने गावाच्या सामाजिक फॅब्रिकमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहेही हानी भरून न निघणारी आहे. त्यांच्या पश्चात भाऊ भाऊजी एक मुलगा एक मुलगी सून नातवंडे असा परिवार आहे

-----------

### थोर स्वातंत्र्यसेनानी स्व.थोरवे दादा यांच्या

मिळणार आहे. गुरुवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.या शिवजयंतीनिमित्त रामायणाचार्य परमपूज्य ह.भ.प.संजय महाराज पाचपोर (बाबा) (विदर्भरत्न) यांचे प्रेरणादायी काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून,त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसाद दिला जाणार आहे.या अखंड हरिनाम सप्ताहात परमपूज्य कर्मयोगी ब्रह्मलीन दत्तात्रय महाराज सुदृढ पाटील यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या अध्यात्मिक बाल संस्कार वारकरी गुरुकुल, मुखेडवाडी येथील विद्यार्थी वर्ग कीर्तनसेवेसाठी उपस्थित राहणार असून त्यांच्या भक्तिरसपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे.या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने स्वातंत्र्यसेनानी वै. साहेबराव थोरवे दादा यांच्या राष्ट्रभक्ती, सामाजिक कार्य, साधी जीवनशैली व आध्यात्मिक विचारांचा वारसा नव्या पिढीसमोर मांडण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात येत आहे.समाजात एकात्मता, सद्भावना व संस्कार वृद्धिंगत व्हावेत,हा या सप्ताहामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.या पवित्र व अध्यात्मिक सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविक,भक्त मंडळी व नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून घ्यावा असे समस्त थोरवे परिवार व सोलापूरवाडी ग्रामस्थ यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.कार्यक्रम सोलापूरवाडी येथे होणार असल्याचे अँड.हनुमंत थोरवे, धैर्यशिल हनुमंतराव थोरवे यांनी सांगितले.

--------------

### स्त्री ही सर्जक आणि विश्वाची

राष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सक्षमीकरणासाठी, लिंग समानतेसाठी आणि समाजातील त्यांची भूमिका अधिक दृढ करण्यासाठीचा आपण सर्वजण मिळून प्रयत्न करत आहोत आणी हा दिवस त्याचे प्रतीक आहे. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, आपल्याला महिलांचे हक्क आणि त्यांचा सन्मान यासाठी एकत्र काम करायचे आहे. या देशांमध्ये नव्हे तर जगामध्ये अनेक महिलांनी आपल्या अलौकिक कार्याने स्त्री ही पुरूषापेक्षा तशी बरी कोणत्याच कामांमध्ये मागे राहू शकत नाही. बुद्धी मध्ये मागे राहू शकत नाही हे सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे या जगाच्या इतिहासामध्ये अनेक स्त्रियांनी कर्तबगारीने आपले नांव सुवर्णक्षरात करून ठेवले आहे असे सांगत समाजातील महिलांनी आम्ही अबला नाहीत तर सबला आहोत आणि कोणते ही कार्य करण्याचे कर्तुत्व आमच्या अंगी ठासून भरले आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. तसेच स्त्री ही सर्जक आहे, जननी आहे. आणि या सृष्टीची निर्माती आहे असे सांगत डॉ.इंगोले यांनी आजच्या दिवशी, आपण हा संकल्प करू की, आपण महिलांना प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी पाठिंबा देऊ, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि लिंगभेद संपविण्यासाठी प्रयत्नशील राहू असे आवाहन ही डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी उपस्थित महिलांचा पुष्पहार व कर्तबगार महिलांचे प्रबोधनपर पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ तथा विभागप्रमुख डॉ.प्रज्ञा किनगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समता मनोहर, अक्षय इंगोले, अजय रापतवार, शेख वाजेद, शेख बाबा, मनोज इंगोले, तुषार मनोहर, मयूर गायकवाड, विशाल अंबाड यांनी प्रयत्न केले.

-----------

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियाना मध्ये

सर व श्री रामचंद्र मुंडे सर यांचे विशेष योगदान लाभले. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे व संघभावनेमुळे शाळेने हे उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच या संपूर्ण अभियानात तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री बाबासाहेब उजगरे यांचे मार्गदर्शन अत्यंत मौलिक ठरले. त्यांच्या सूचनांमुळे व प्रेरणेमुळे शाळेला योग्य दिशा मिळाली आणि दर्जेदार काम साकार झाले. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री मुंजाबा डांबे व सर्व सदस्य तसेच गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. गावकऱ्यांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत पुढील उपक्रमांसाठीही संपूर्ण सहकार्य देण्याचा विश्वास दिला. मुख्याध्यापकांनी शिक्षकवृंद, पालक, शालेय व्यवस्थापन समिती आणि गावकऱ्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, ''हे यश संपूर्ण गावाचे आहे. आगामी काळातही शाळेला अधिक गुणवत्तापूर्ण व आदर्श शाळा बनविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करू,'' असे सांगितले. या उल्लेखनीय यशामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाणचा लौकिक अधिक वृद्धिंगत झाला असून तालुक्यात शाळेचे नाव अभिमानाने घेतले जात आहे.

------------

## पान १ वरून...

पान १ वरून...

### केंद्राकडून २५ लाख

जवळपास २ लाख टन साखरेचीच जानेवारीपर्यंत निर्यात झाली आहे. तर जवळपास ३ लाख टन निर्यातीचे सौदे झाल्याची माहिती आहे. आता चालू हंगामासाठी निर्यातीचा कोटा २० लाख टन झाला आहे.

---------------

### लाचखोर सरकारच्या

केली आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याला मंत्रालयात लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यामुळे लाचलुचपत विभागाने मंत्री कार्यालय सील केले आहे. या घटनेने राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. चौकशीदरम्यान वरिष्ठांच्या सांगण्यावरून लाच घेतल्याचे या कर्मचाऱ्याने सांगितल्याची माहिती समोर येत आहे. हे आणखी धक्कादायक आणि गंभीर आहे. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र नैतिक जबाबदारीच्या दृष्टीने, आपल्या कार्यालयात खुलेआम लाचखोरी सुरू असल्याचे समोर आल्यावर निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी तात्काळ मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे ते म्हणाले. दरम्यान, नरहरी झिरवाळ यांनी नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना या प्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, घडलेला प्रकार साफ चुकीचा आहे. असे व्हायला नको होते. ज्यांना पकडण्यात आले, ते क्लार्क म्हणून काम करतात. ते मूळचे अन्न व पाणी पुरवठा विभागाचे आहेत. त्यांना उसणवारीवर घेतले होते. मी या प्रकाराला पाठिशी घालणार नाही. शासकीय किंवा कायदेशीर बाब असेल त्याला त्याचा जाब द्यावा लागेल, असे ते म्हणाले. लाचखोर क्लार्क राजेंद्र ढेरंगे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी कोर्टापुढे हजर केले. तिथे कोर्टाने त्याची १६ तारखेपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागाशी संबंधित लाचप्रकरण उघडकीस आल्यानंतर राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळणारे नरहरी झिरवाळ यांनी आपली भूमिका स्पष्ट करत अनेक मुद्यांवर सविस्तर प्रतिक्रिया दिली. या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध सिद्ध झाल्यास नैतिकतेच्या मुद्यावर तात्काळ राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. जर माझी कोणतीही 'लिंक' आढळली, तर पदावर राहण्याचा प्रश्नच नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

-----------

### कोळसा घोटाळा प्रकरणी

मालमत्तांमध्ये रिअल इस्टेट, मुदत ठेवी आणि म्युच्युअल फंड गुंतवणूक समाविष्ट आहे. या मालमत्ता शाकंभरी इस्पात आणि पॉवर लिमिटेड आणि गगन फेरोटेक लिमिटेड यांच्या नावावर आहेत. ईडीने स्पष्ट केले आहे की बेकायदेशीर खाणकाम आणि मनी लॉंडरिंगसारखे गुन्हे देशाच्या नैसर्गिक संसाधनांना हानी पोहोचवतात आणि सार्वजनिक हिताच्या विरुद्ध आहेत. अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई सुरूच राहील.

----------

### माझ्याशी संबंध सिद्ध झाले तर

जी घटना घडली, ती अत्यंत चुकीची आहे आणि असे व्हायला नको होते. राजेंद्र ढेरंग हे लिपिक म्हणून कार्यरत होते. सुनावणीसंबंधी कागदपत्रे तयार करण्याचे काम त्यांच्याकडे होते. ते मूळचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी असून, उसनवारीवर या विभागात नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी केलेल्या गैरप्रकाराला कुठेही पाठिशी घातले जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

---------------

### राज्यातील बोगस दिव्यांग

कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा सर्व संस्थानी २८ फेब्रुवारी अखेरपर्यंत संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले. संस्थानी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी केल्यामुळे त्यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण व पुनर्वसन करणे शक्य होईल. हे कार्य करताना दिव्यांगांच्या हक्कांचे, अधिकारांचे उल्लंघन होणार नाही व त्यांना न्याय दिला जाईल याबाबतीत दक्षता घेतली जाईल.त्यामुळे सर्व संस्थानी नोंदणी करून , दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार त्याअंतर्गतची नियमावली व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या योजना व धोरणानुसार कार्य करणे अपेक्षित आहे जेणेकरून दिव्यांगांचे पुनर्वसन व सक्षमीकरण साध्य करणे शक्य होईल, असेही मुंढे यांनी सांगितले.

-----------

### शेतकऱ्यांना पीएम किसानचा

यादीनुसार, सर्वाधिक उत्तर प्रदेशातील सुमारे १० लाख शेतकऱ्यांची बँक खाती आधारशी लिंक केलेली नाहीत. तर महाराष्ट्रातील १,७२,३४८ शेतकऱ्यांनी आधार लिंक केलेले नाही. तुमचे बँक खाते आधारशी लिंक करण्यासाठी तुम्ही ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धती वापरू शकता.

--------------

### महिला उद्योजकांसाठी पर्यटन

भास्करवाडी, पालघर येथे पालघर डिस्ट्रिक्ट टुरिझम डेव्हलपमेंट वेल्फेअर असोसिएशनच्या सदस्यांसोबत आयोजित चर्चासत्रात त्या बोलत होत्या. ३१ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या चर्चासत्रात पर्यटन विभागाच्या 'आई' महिला-केंद्रित पर्यटन धोरणाची सविस्तर माहिती देण्यात आली. पर्यटन क्षेत्रात महिला उद्योजकांनी अधिकाधिक सहभाग नोंदवून स्वतःचा व्यवसाय उभारावा व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. 'आई' पर्यटन धोरणांतर्गत महिला उद्योजकांना पर्यटनाशी संबंधित व्यवसाय सुरू करण्यासाठी अधिकृत बँकेकडून रुपये १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर झाल्यास, त्या वरील व्याजाचा परतावा पर्यटन संचालनालयामार्फत देण्यात येणार आहे. हा व्याज परतावा १२ टक्क्यांच्या दराने किंवा कमाल रुपये ४.५० लाखांपर्यंत अथवा कर्ज कालावधी ७ वर्षे पूर्ण होईपर्यंतयापैकी जे आधी घडेल त्या निकषांनुसार अदा करण्यात येणार आहे. या योजनेमुळे महिला उद्योजकांना पर्यटन क्षेत्रात आर्थिक पाठबळ मिळणार असून, महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच स्थानिक पर्यटन उद्योगालाही चालना मिळण्यास मदत होणार आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.अधिक माहितीसाठी इच्छुक महिला उद्योजकांनी विभागीय पर्यटन कार्यालय, कोकण भवन येथे प्रत्यक्ष भेट देऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यटन विभागामार्फत करण्यात आले आहे.

-------------

### पंतप्रधान यांनी केले तीर्थ संकुलातील

(नागरिक देवो भव) असे ब्रीदवाक्य आहे. पंतप्रधान कार्यालय रायसिना हिलवरील साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ येथे स्थलांतरित होईल, ज्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाची कार्यालये एकत्र येतील. पंतप्रधान मोदींनी नवीन इमारतीचे उद्घाटन केले तेव्हा गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. २०१४ पासून, मोदी सरकारने भारताच्या वसाहतवादी भूतकाळातील प्रतीकांपासून दूर जाण्यासाठी आणि मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की पंतप्रधान कार्यालयाला आता सेवा तीर्थ असे संबोधले जाईल, केंद्रीय सचिवालयाच्या इमारतींना कर्तव्य भवन असे नाव देण्यात आले आहे आणि राजपथाचे नाव कर्तव्य पथ असे ठेवण्यात आले आहे. त्याच भावनेने, पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या रेसकोर्स रोडचे नाव लोक कल्याण मार्ग असे ठेवण्यात आले आहे आणि राजभवन आणि राज निवास यांचे नाव अनुक्रमे लोक भवन आणि लोक निवास असे ठेवण्यात आले आहे. हे उद्घाटन भारताच्या प्रशासकीय प्रशासन स्थापत्यकलेतील एक परिवर्तनकारी टप्पा आहे आणि आधुनिक, कार्यक्षम, सुलभ आणि नागरिक-केंद्रित प्रशासन परिसंस्था तयार करण्याच्या पंतप्रधानांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे, असे पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. अनेक दशकांपासून, अनेक प्रमुख सरकारी कार्यालये आणि मंत्रालये सेंट्रल व्हिस्टा क्षेत्रातील अनेक ठिकाणी पसरलेल्या तुटलेल्या आणि जुन्या पायाभूत सुविधांमधून काम करत होती. या विखुरलेल्या परिस्थितीमुळे ऑपरेशनल अकार्यक्षमता, समन्वय आव्हाने, वाढत्या देखभाल खर्च आणि कमी-इष्टतम कामकाजाचे वातावरण निर्माण झाले. नवीन इमारत संकुल आधुनिक, भविष्यासाठी तयार सुविधांमध्ये प्रशासकीय कार्ये एकत्रित करून या समस्यांचे निराकरण करतात, असे त्यात म्हटले आहे.

-------------

### राज्यात 'आरटीई' अंतर्गत शाळा,

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आर्थिक मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश जागा कमी होत आहेत. उदाहरणार्थ २०१८-१९ मध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी ८९८० शाळांमध्ये १ लाख २६ हजार १४० जागा होत्या. २०२६-२७ साठी ८६५५ शाळा, १ लाख १२ हजार ८८५ जागा आहेत. म्हणजेच नऊ वर्षांत ३२५ शाळा, १३ हजार २५५ जागा कमी झाल्या आहेत, अशी माहिती अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर, २५ टक्के आरक्षण पालक सभेच्या अध्यक्ष सुरेखा खरे यांनी दिली. तसेच शासनाकडून वेळेवर शुल्क प्रतिपूर्ती केली जात नाही, आरटीईच्या नियमातून सुटण्यासाठी अनेक शाळा अल्पसंख्याक शाळा दर्जा घेतात, ही त्यामागील कारणे आहेत. पुण्यातील अनेक मोठ्या शाळांची नावे २०२६-२७ च्या यादीत नाहीत. हे चित्र आरटीईच्या उद्दिष्टांच्या विरोधात आहे, असे त्यांनी सांगितले.

----------

cmyk

cmyk

## गुजर समाजाकडून नगराध्यक्ष प्रतिनिधी व सभापतींचा सत्कार

बीड : बीड नगराध्यक्षांचे प्रतिनिधी मुजीब शेख व नगरपरिषदेचे सभापती निजाम शेख यांचा गुजर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बीड शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ व अखिल भारतीय देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी स्वच्छता, रस्ते, नाल्या, पाणी व वीज या मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देण्याची मागणी केली. शहरवासीयांच्या अपेक्षा पूर्ण करून बीड शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी कार्य कराल, अशी अपेक्षा व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. या सत्कारप्रसंगी अ‍ॅड. खाजाभाई, मुन्नाभाई, गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, अखिल भारतीय देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, शहराध्यक्ष हनुमान गुजर कल्याण निर्मळ, युवा सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष इंद्रजीत पांचाळ यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६



# जातमुक्त भविष्यासाठी हाक सैंदाळा ग्रा. पं.च्या निर्णयाने निर्माण केली आशेची नवी पहाट

## जिल्ह्यातील ग्रामपंचायतीसोबत प्रशासनाने समन्वय साधत प्रोत्साहित करावे-सरवदे

बीड । प्रतिनिधी

गेल्या दोन वर्षांपासून सामाजिक सलोखा ढासळल्याच्या पार्श्वभूमीवर आता समाजमनाला हादरवून टाकणारी पण तितकीच आशेची किरण देणारी चळवळ पुढे येताना दिसत आहे. जात आणि धर्माच्या नावावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तींमुळे संविधानाने दिलेले बंधुता, समता आणि सामाजिक न्यायाचे मूल्य धोक्यात आले असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा व समानतेचा अधिकार दिला आहे. भारत देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या संविधानातील कलम १४, १५, १७,




१९ आणि २१ नागरिकांच्या सन्मान, समानता आणि भेदभावमुक्त जीवनाची हमी देतात. तसेच राज्याच्या धोरणनिर्देशक तत्वांतील कलम ३८ व ४६ समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण आणि सामाजिक न्यायाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्यावर टाकतात.

आज जग प्रगतीच्या दिशेने झेपावत असताना जिल्ह्यातील काही ठिकाणी जातीयतेचे सावट वाढताना दिसत आहे. ही बाब केवळ सामाजिक नव्हे तर संविधानिक दृष्ट्याही गंभीर मानली जात आहे. याच पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्ह्यातील सैंदाळा ग्रामपंचायतीने गाव जातमुक्त करण्याचा ऐतिहासिक ठराव मंजूर करून समाजासमोर परिवर्तनाचा आदर्श ठेवला आहे. या निर्णयामुळे सामाजिक ऐक्य, बंधुता आणि समानतेचा नवा मार्ग खुला झाला असून राज्यभरातून या निर्णयाचे कौतुक होत आहे. सामाजिक परिवर्तनाच्या या लाटेला गती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व ग्रामपंचायतींना जातमुक्त गाव ठराव मंजूर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी जोरदार मागणी होत आहे. केवळ ठराव न करता प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सक्षम यंत्रणा उभारणे, जातीय द्वेष पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, ग्रामस्तरावर सामाजिक सलोखा समित्या स्थापन करणे आणि संविधान मूल्य जनजागृती मोहिमा राबविणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. सामाजिक ऐक्य आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण ही प्रशासन व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त जबाबदारी असल्याचे अधोरेखित करण्यात येत आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडी चे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, अर्जुन जवंजाळ, राजेशकुमार जोगदंड, सम्यकचे रोहन मगर, माथाडी संघटनेचे आकाश जावळे, संतोष जोगदंड, मिलिंद सरपते, किशोर भोले, शहराध्यक्ष लखन जोगदंड आदी उपस्थित होते.

## पाटोदा-मांजरसुंबा रोडवर भीषण अपघात

### अज्ञात वाहनाच्या धडकेत निष्पाप हरणाचा मृत्यू

पाटोदा । प्रतिनिधी

निसर्गाचा अनमोल ठेवा आणि सौंदर्याचे प्रतीक असलेल्या एका निष्पाप हरणाचा पाटोदा-मांजरसुंबा रोडवर झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी अंत झाला. भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत या चपळ जीवाचा जागीच मृत्यू झाल्याने निसर्गप्रेमी आणि प्राणिमित्रांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटोदा ते मांजरसुंबा दरम्यान असलेल्या घाट परिसरात रस्ता ओलांडत असताना एका हरणाला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, या मुक्या जीवाचा जागीच श्वास कोंडला. अपघाताची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि प्राणिमित्रांनी घटनास्थळी धाव घेतली.अधिकारी व प्राणिमित्रांची उपस्थिती: या घटनेची गांभीर्याने दखल घेत वनविभागाचे अधिकारी देवगुडे साहेब, वनपाल सानप साहेब, आणि वनपाल पवार मॅडम यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा



केला. यावेळी प्रसिद्ध प्राणिमित्र गणेश खाडे (मेजर) यांनी देखील घटनास्थळी धाव घेऊन शोक व्यक्त केला. याप्रसंगी वनविभागाचे कर्मचारी आणि स्थानिक मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.पाटोदा परिसर हा वन्यजीवांसाठी ओळखला जातो, मात्र वाढत्या रस्ते अपघातांमुळे वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. ''निसर्गातील या सुंदर जीवाचा असा अंत होणे अत्यंत दुःखद आहे,'' अशा भावना व्यक्त करत उपस्थितांनी या मुक्या जिवाला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालकांनी वन्यजीव क्षेत्राचा विचार करून वाहने सावकाश चालवावीत, असे आवाहन यावेळी वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## हिवाळी परीक्षा व विभागीय वॉलीबॉल स्पर्धेत ईगलवूड पॉलिटेक्निकचे यश



माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव येथील ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने शैक्षणिक व क्रीडा या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला आहे. हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले असून, अंतर्गत झालेल्या विभागीय आंतरमहाविद्यालयीन वॉलीबॉल स्पर्धेतही दमदार कामगिरी नोंदवली आहे.

हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये महाविद्यालयाचा निकाल अत्यंत समाधानकारक लागला असून सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ( ) शाखेतील धनावडे ऋतुजा हिने ८८.७१% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे तिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेतील मदने आरती हिने ८८% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेतील प्रगती मेंडके हिने ८०.९४% गुण मिळवले, तर सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील जयवर्धन सोनवणे याने ८१.११% गुणांसह यश मिळवले.

शैक्षणिक यशासोबतच क्रीडा क्षेत्रातही ईगलवूड पॉलिटेक्निकने आपली ताकद दाखवून दिली. विभागीय वॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर मुलांच्या संघाने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर द्वितीय क्रमांक मिळवला. मुलींच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत शिस्त, संघभावना आणि अचूक समन्वय राखत प्रत्येक सामन्यात वर्चस्व गाजवले. अंतिम सामन्यातील चुरशीच्या लढतीत त्यांनी विजेतेपदावर आपले नाव कोरले. मुलांच्या संघानेही कठीण प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध संघर्षमय खेळ करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि उपविजेतेपद पटकावले.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, सचिव डॉ.शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ.सुशील लोढा, प्राचार्य प्रतीक वेळापुरे, क्रीडा शिक्षक सुलतान सर तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या सर्वांगीण यशामुळे ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमधील शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही शिक्षण व क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळाली असून, भविष्यात आणखी मोठ्या यशाची नोंद होईल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

## वानगाव येथे के.के पब्लिक स्कूल; वार्षिक स्नेहसंमेलन

चौसाळा । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबर सांस्कृतिक क्षेत्रातील सक्रिय सहभाग नोदवून स्वतः ची वेगळी ओळख निर्माण करावी या उपक्रमामुळे व्यक्तिमत्त्व व विकासाला चालना मिळते असे प्रतिपादन शाळेची संस्थापक राऊत सर यांनी केले राजर्षी शाहू महाराज संस्था संचलित बीड तालुक्यातील वानगाव येथे आज दिनांक ११ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यकमाचे उद्घघाटक डॉ प्रशांत गायकवाड अध्यक्ष जोगदंड सर होते. व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक राऊत सर सरपंच खडकी घाट सुरेश वाघ .विजया वाघमारे सरपंच सावरगाव इतर मान्यवर उपस्थित होते.प्रथम शाळेचे संस्थापक राऊत सर व इतर मान्यवर यांनी सरस्वती प्रतिमेचे पूजन



करून दिपप्रज्वलन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राऊत मार्गदर्शन करताना गुणवंत होण्यापेक्षा गुंतवणूक कितीवान होणे महत्त्वाचे आहे मोलाचे मार्गदर्शन केले व सुत्रसंचलन पाटील मॅडम केले. यामधे छोट्या चिमुकल्या कलाकारांनी भरतनाट्यम गुलाबी सांडी कोळी गीत नाटक देशभक्ती पाटलांचा बैल गाडा व जन्म बाईचा या गाण्यावर स्त्री आधारित व बेटी बचाव बेटी

## होळ वीज उपकेंद्रात १० क्षमतेचे रोहित्र तात्काळ बसवा ; अन्यथा बेमुदत ठिय्या आंदोलन

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांचा इशारा!

केज /प्रतिनिधी

तालुक्यातील होळ ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्रातुन,होळ, लाडेगाव , दिपेवडगाव ,लाडेवडगाव ,मुलेगाव ता. केज येथील शेतकऱ्यांना शेती साठी वीज पुरवठा दिला जातो. मात्र सद्यस्थितीत होळ ३३के.व्ही.वीज उपकेंद्रातुन क्षमतेपेक्षा अधिक वीजेची मागणी असुन वरिल गावातील जवळपास सर्वच फिडर वरील रोहित्रातुन कमी दाबाने व अनियमिततेने शेतकऱ्यांना तब्बल ३० तास व काही फिडर वर ३६ तासानंतर फक्त ६ तास वीजपुरवठा दिला जात आहे .यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे भिजवणे होत नसून पिके वाळून जात आहेत . या सर्वच गावातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने दिवसा आठ तास वीज देण्याच्या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदिप करपे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या वतीने होळ ३३ के.व्ही. उपकेंद्र कनिष्ट अभियंता कार्यालयासमोर दि.११डिसेंबर २०२५ रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते . तेंव्हा महावितरण अधिकाऱ्यांनी लेखी दिलेल्या लेखी आश्वासनुसार सदर आंदोलन स्थगित करण्यात आले होते या पत्रातील आश्वासनानुसार होळी विद्युत ३३के.व्ही वीज उपकेंद्रात १० क्षमतेचे रोहित्र बसवून वीजपुरवठा उच्च दाबाने सर्व कृषि ग्राहकांना पुरवठा करणे आवश्यक होते मात्र अद्यापही रोहित्र न बसवल्याने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ पासुन बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा बीड येथील महावितरण च्या मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री.प्रेमसिंग राजपूत यांना निवेदनाद्वारे बुधवारी दि.११रोजी प्रत्यक्ष भेटून दिला आहे.

## सार्वजनिक शिवजयंती जन्मोत्सवअध्यक्षपदी पप्पू लांडे

बीड । प्रतिनिधी

येथील शिवजयंती उत्सव बीडचे आ. संदीपभैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिवर्षी उत्साहात साजरा होत असतो प्रतिवर्षी या उत्साहामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम,पारंपारिक कला,लेझीम पथक, चित्त थरारक प्रात्यक्षिके, ढोल पथक, लेझर शो, तसेच वेगवेगळ्या प्रांतातील कलाकारांचा सहभागाने बीडच्या या जन्मोत्सव सोहळ्याची महाराष्ट्रात खूप चर्चा आहे; परंतु यावर्षी बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री स्व. श्री. अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनामुळे यावर्षी शिवजयंती उत्साहात न साजरी करता एकदम साधेपणाने साजरी करण्याचे आ. संदीपभैया क्षीरसागर व मागील वर्षाच्या शिवजयंती उत्सव समितीच्या कार्यकारणीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते



ठरले.

दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी शासकीय विश्राम गृह बीड येथे नवीन कार्यकारणीच्या स्थापनेच्या वेळेस मा. आ.संदीपभैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीच्या शिवजयंती जन्मोत्सव साठी मा.श्री.नितीन उर्फ पप्पू गंगाधर लांडे (पाटील) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली,तसेच उपाध्यक्षपदी सिद्दिकी फारुकी व श्री.दत्ता काशीद (पैलवान) यांची निवड करण्यात आली. या कार्यकारिणीच्या निवडीसाठी बैठकीला मागील अध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील, यांच्यासोबत माजी अध्यक्ष प्रा.विजय पवार अ.भा.छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, सामाजिक कार्यकर्ते विनोद अण्णा धांडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष बाळासाहेब गोरे, जय मल्हार बागल, तसेच माजी अध्यक्ष दत्ता साळुंके यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश करवा यांनी केले व प्रा. विजय पवार तसेच मागील अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील यांनी यावर्षीची शिवजयंती साधेपणाने साजरी करण्यासाठी मार्गदर्शन केले. नूतन कार्यकारणीच्या निवडीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन नियुक्तीचे प्रमाणपत्र दिले व निवडीबद्दल सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

## नगरसेवक राजू वैद्य यांचा पाटोदा पत्रकार संघाकडून सत्कार



पाटोदा : प्रतिनिधी

पाटोद्याचे भूमिपुत्र तथा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाकडून नवनिर्वाचित नगरसेवक रेणुकादास उर्फ राजू वैद्य यांचा पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने गुरुवारी भव्य सत्कार करण्यात आला. राजू वैद्य हे रेणुका देवी माळावरील दर्शनासाठी पाटोदा येथे आले असता पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत केले.

राजू वैद्य हे पाटोद्याचे सुपुत्र असून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत सलग चौथ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. यापूर्वी त्यांनी महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदाची तसेच गटनेतेपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून यंदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यानंतर मतदारांनी त्यांना भरघोस मतांनी विजयी केले आहे.

# मेहनतीच्या जोरावर यशस्वी झालेला तरुण उद्योजक अजय घोडके

## अंकुर गुळाला परराज्यातूनही मागणी







बीड /विशाल साळुंके

सतत दहा वर्षे अथक परिश्रम आणि मेहनतीच्या जोरावर बीड तालुक्यातील लोळदगाव येथे एका तरुण उद्योजकाने अंकुर गुळाचे नाव पर राज्यातही 'ब्रँड' म्हणून प्रसिद्ध केले. ही काही सोपी गोष्ट नाही. पण तरीही सर्व टीम च्या मदतीने आज अंकुर गुळ गुजरात, झारखंड आणि महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात जातो. लोकांना परवडेल आणि आवडेल अशा पद्धतीने ळोळदगावच्या या युनिटमध्ये पाच ग्रॅम पासून दहा किलो पर्यंत वेगवेगळ्या पॅकिंग मध्ये हा गूळ विकला जातो. याशिवाय 'काकवी' ही पॅकिंग द्वारे विकली जाते .बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्राच्या पटलावर आणण्यासाठी या तरुण उद्योजक अजय घोडके यांचा मोठा वाटा आहे.

या युनिट बद्दल माहिती सांगताना अजय घोडके सांगतात मी २०१७ मध्ये हे युनिट अगदी साध्या पद्धतीने सुरू केले. जुन्या पद्धतीने चार वर्षे चालवले. त्यानंतर हे युनिट स्वयंचलित(ऑटोमॅटिक) केले. त्यासाठी जवळपास तीन कोटी रुपये गुंतवणूक करावी लागली. ही गुंतवणूक टप्प्याटप्प्याने केली. मात्र आज संपूर्ण युनिट व्यवस्थित चालू असून दररोज उसाचे साठ टन गाळप या ठिकाणी केले जाते केले जाते. बीड तालुक्यातील अनेक शेतकरी या ठिकाणी ऊस द्यायला पसंती देतात. प्रामाणिकपणाच्या जोरावर अजय घोडके यांनी हे यशस्वी केले. सुरुवातीला बीड जिल्ह्यातील मजूर या ठिकाणी काम करायचे. मात्र पूर्ण वेळ हे युनीट चालत नव्हते. त्यानंतर मध्य प्रदेश ,झारखंड मधून यासाठी मजूर आणले. ते दोन शिफ्ट मध्ये रात्रंदिवस काम करतात. हे युनिट चालवताना खंड न पडता चालवावे लागते. त्यामुळे दररोज ६० टन ऊस गाळप होतो. सर्व युनिट स्वयंचलित असल्याने सर्व कामे वेळेवरच करावी लागतात. आज 'अंकुर' या ब्रँड ने हा केमिकल मुक्त गावरान गूळ गुजरात, झारखंड या दोन राज्यासह बीड ,पुणे, लातूर, सोलापूर ,जळगाव, धुळे अशा अनेक जिल्ह्यांमध्ये जातो. याची पाच ग्रॅम पासून दहा किलो पर्यंत पॅकिंग केली जाते. शुद्ध गुळाला मोठी मागणी असल्याने माल शिल्लक राहत नाही. आता हे युनिट व्यवस्थित चालू असून सेंद्रिय गुळाला मोठी मागणी आहे. अजय घोडके यांनी पुण्यातही



ज्यावेळी एखादा नवीन उद्योजक स्वतःच्या बळावर एखादा उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न करतो. त्यावेळी बँकेला सर्व कागदपत्रे देऊनही बँका कर्ज द्यायला उदासीन असतात. मीही त्यासाठी अनेक वेळा चपला झिजवल्या. मात्र ज्यावेळी माझे युनिट उभे राहिले त्यानंतरच मला बँकेने कर्ज दिले. तेही तुटपुंजे. बँकांनी जर समोरच्या युवकाचा आत्मविश्वास पाहून त्याला मदत केली तर बीड जिल्ह्यामध्ये चांगले उद्योग उभे राहू शकतात .आपल्या जिल्ह्यामध्ये युवकांची मेहनत करायची तयारी नाही. त्यामुळे नाईलाजाने मजूर बाहेरून आणावे लागतात. हे मजूर बारा -बारा तास शिफ्टमध्ये काम करतात. त्यांना गुत्तदारी पद्धतीने हे काम दिलेले आहे.

-अजय घोडके, ळोळदगाव

**अत्याधुनिक यंत्रणा** : अंकुर गूळ युनिटमध्ये अत्याधुनिक यंत्रणा तयार करण्यात आली आहे. अगदी ऊस क्रॉसिंग पासून ते गुळ तयार होईपर्यंत प्रत्येक ठिकाणी स्वयंचलित यंत्रणा आहे. उसापासून रस तयार केल्यानंतर तो गरम केला जातो. त्यासाठी जी उष्णता लागते तिही अत्याधुनिक पद्धतीने उसापासून निघणाऱ्या भूषाद्वारे दिली जाते. त्यानंतर निघणारी मळी स्वयंचलित पणे बाजूला जाते. या मळीचा शेतात खतासाठी वापर होतो. त्यानंतर हा गुळ एका दहा बाय दहाच्या एक फुट खोल असलेल्या हौदात येऊन पडतो. आणि थंड झाल्यानंतर त्याचे वेगवेगळे आकारात ढेपी तयार केल्या जातात. ही सर्व कामे वेळेतच झाली पाहिजेत अशी ही यंत्रणा आहे. त्यासाठी मजूरही तेवढे सजग लागतात. या ठिकाणी कामात टाळाटाळ करता येत नाही.

आपले कार्यालय सुरू केले असून पुणे जिल्ह्यातही या गुळाला मोठी मागणी आहे.

स्वतःच्या हिमतीवर आणि विश्वासावर हे युनिट २०१७ मध्ये सुरू झाले. आज या युनिटला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. सतत मेहनत करून हे युनिट उभे राहिले. यासाठी कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनीही मोठी साथ दिली. अजय घोडके यांनी स्वतःचाच उद्योग सुरू केला नाही तर याबरोबरच गावाचा विकास करण्यासाठी ते यशस्वी झाले. अगदी नदीचे खोलीकरण, गावाची स्वच्छता ,वृक्षारोपण, शुद्ध पाणी, चांगले रस्ते, पथदिवे हे काम त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने यशस्वी केले. त्यांना स्वच्छता व पाणी पुरवठा मंत्रालयाचा स्वच्छतेचा राज्य स्तरावरील पुरस्कार मिळालेला आहे. आज या ठिकाणी काम चांगले असल्याने प्लॅस्टिक युनिट सुरू होत आहे. सरकारच्या वतीने प्रत्येक तालुक्यामध्ये एक युनिट सुरू केले जात आहे. त्यामध्ये बीड तालुक्यात ळोळदगाव गाव येथे सुरू होत आहे. सामूहिक प्रयत्न आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर हे सर्व शक्य झाले. आज गावाच्या कारभाराबरोबरच ते आपला स्वतःचा उद्योगही यशस्वीपणे सांभाळतात. हे स्वतःवर असलेल्या आत्मविश्वासाने सातत्याने केलेल्या प्रयत्नामुळे शक्य झाले. असे अजय घोडके सांगतात.

cmyk




# बीड जिल्ह्यात महारेशीम अभियान २०२६ चा एल्गार

## शेतकऱ्यांना मिळणार ४.३२ लाखांचे अनुदान

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला गती देण्यासाठी आणि रेशीम उद्योगाचे क्षेत्र विस्तारण्यासाठी जिल्ह्यात 'महारेशीम अभियान २०२६' मोठ्या जोमाने राबविले जात आहे. महाराष्ट्र शासनाच्या रेशीम संचालनालय, नागपूर आणि जिल्हा रेशीम कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना एकरी ४ लाख ३२ हजार २४० रुपयांचे भरघोस अनुदान दिले जाणार आहे.

अभियानाचा शुभारंभ : या अभियानाची सुरुवात निवासी जिल्हाधिकारी श्री. स्वामी सर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मुळे सर,उपमुख्यकार्यकारी अधिकारी (जि.प.) श्री. जाधव सर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. साळवे साहेब, मुख्य वनाधिकारी श्री. गरकळ साहेब आणि मुख्य कार्यकारी अभियंता (सा. बां) श्री. तोंडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रेशीम रथाला हिरवा झेंडा दाखवून या विशेष मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या रथाच्या माध्यमातून



जिल्ह्यातील गावागावांत रेशीम शेतीचा प्रचार आणि प्रसार केला जाणार आहे. अनुदानाचे सविस्तर स्वरूप : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दिले जाणारे हे अनुदान दोन प्रमुख टप्प्यांत विभागलेले आहे:

तुती लागवड: यासाठी ६८२ मनुष्य दिवसांच्या मजुरीसह एकूण २,४४,७८४ रुपये अनुदान दिले जाईल. कीटक संगोपन गृह बांधकाम: यासाठी २१३ मनुष्य दिवसांच्या मजुरीसह एकूण १,८७,४५६ रुपये अनुदान दिले जाईल.

एकूण लाभ: कुशल आणि अकुशल कामांच्या मजुरीसह शेतकऱ्याला एकूण ४,३२,२४० रुपयांचा लाभ मिळणार आहे. ४ फेब्रुवारी ते ५ मार्च दरम्यान विशेष मोहीम जिल्ह्यात ४ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत हे विशेष अभियान चालणार आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्री. एस. बी. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालय अधीक्षक श्री. के. एन. राठोड, श्री. एस. वाय. जोजन आणि वरिष्ठ क्षेत्रीय सहाय्यक व आदी कर्मचारी विशेष परिश्रम घेत आहेत जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्री. एस. बी. वराट यांचे आवाहन या मोहिमेबाबत अधिक माहिती देताना जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्री. एस. बी. वराट म्हणाले की, ''रेशीम शेती हा कमी कष्टात आणि कमी पाण्यात शाश्वत उत्पन्न देणारा उद्योग आहे. 'रेशीम उद्योगाची कास धरा, लक्ष्मी येईल आपल्या घरा' या ब्रीदवाक्यानुसार, जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपले नाव नोंदवावे''. इच्छुक शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी दहिफळे प्लाझा, एस.बी.आय. इन टच च्या वर, बार्शी रोड, बीड येथील जिल्हा रेशीम कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा.

## गायीची फुले त्रिवेणी जात पाळा; दूध व्यवसायात होईल प्रगती!

महाराष्ट्रात दुग्धव्यवसायाला जोडधंद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यातच देशासह जगभरात सध्या दुधाची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत आहे. त्यामुळे दुग्धव्यवसायात उतरण्याचा विचार करत असाल तर गायीची चांगली जात निवडण्याची गरज आहे. कारण दुग्धव्यवसाय सुरु करताना पहिला प्रश्न पडतो. दूध उत्पादनासाठी गाय किंवा म्हैस घ्यावी कोणती? महाराष्ट्रातील 'फुले त्रिवेणी' ही गाय दुधासाठी सर्वात चांगली मानली गेली आहे. या जातीच्या गायीच्या मदतीने दूध व्यवसाय सुरु केल्यास शेतकऱ्यांच्या घरी दुधाची गंगा वाहण्यास मदत होणार आहे.



तीन जातींचा आहे संकर : 'फुले त्रिवेणी' ही जात म्हणजे महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांनी विकसित केलेली गायीची 'फुले त्रिवेणी' जात होय. फुले त्रिवेणी ही गाईची एक सुधारित जात आहे. या गाईची सर्वात मोठी विशेषतः म्हणजे ही होलस्टेन फ्रीजियन ५० टक्के, जर्सी २५ टक्के व गीर २५ टक्के या जातींचा संकर मिळून तयार करण्यात आली आहे.वेताला किती देते दूध? 'फुले त्रिवेणी' ही गाय तीन गायींचा एकत्रित वंश असल्याने या गाईला फुले त्रिवेणी असे नाव देण्यात आले आहे. या जातीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन मिळत आहे. ही जात एका वेतात ३००० ते ३५०० लिटरपर्यंत दूध देत आहे. तसेच 'फुले त्रिवेणी' या गायीची रोगप्रतिकारशक्ती देखील चांगली असल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होतो.पिढीजात उत्पादन वाढतेच : 'फुले त्रिवेणी' या जातीमध्ये मूळ जातीची गाय जेवढे उत्पादन देते. तिची पुढील पिढी देखील तेवढे उत्पादन देते. या जातीचे वळुंचे गोठीत वीर्य महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या ठिकाणी उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील हवामानात या जातीचे संगोपन फायदेशीर आहे. यामुळे तज्ञांकडून या गाईच्या संगोपनाचा सल्ला दिला जातो. त्यामुळे आता तुम्ही देखील या जातीच्या गायीच्या पालनातून मोठी आर्थिक प्रगती साधू शकतात.

## जळगाव जिल्ह्यात केळी पिकासाठी २१६ कोटींचा विमा लाटण्याचा डाव उघड

जळगाव / प्रतिनिधी

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या आंबिया बहर हंगामात यंदा केळी उत्पादक जळगाव जिल्ह्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २७ हजारांहून अधिक अर्ज आल्यानंतर संशयास्पद क्षेत्राची उपग्रहाच्या साह्याने तपासणी करण्यात आली. त्यात ४४ हजार हेक्टरवर केळीपीकच आढळलेले नाही. या बनावट अर्जदारांचे विमा हप्त्यापोटीचे ३७ कोटी ४३ लाख रुपये जप्त करण्यात आले. तर राज्य सरकारचे १२३ कोटी ५३ लाख आणि केंद्राचे ९३ कोटी ५८ लाख रुपये वाचले आहेत. अन्य जिल्ह्यांतही अशा संशयास्पद अर्जाची तपासणी सुरू असल्याचे कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.



यंदा जळगाव जिल्ह्यात २७, २५९ अर्ज वाढले. यातून विमा संरक्षित क्षेत्र २८,१९६ हेक्टरने वाढले. ही वाढ अनैसर्गिक व अतिरिक्त असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कृषी आयुक्तांच्या पथकाने केलेल्या तपासणीत चार तालुक्यांमधील ७४ शेतकऱ्यांकडे केळी पीकच आढळले नाही. या शेतकऱ्यांनी आठ लाखांचा विमा हप्ता भरून नुकसानभरपाईची सव्वादोन कोटींची रक्कम लुबाडण्याचा प्रयत्न केला. यापूर्वीही २०२२-२३ मध्ये जिल्ह्यात २० हजार ५७९ अर्ज अपात्र ठरले होते. जिल्ह्यातील विमा संरक्षित ९६ हजार १५२ हेक्टर एवढ्या लागवडीखालील जमिनीची तपासणी कृषी विभागाकडून करण्यात आली. त्यापैकी ५२ हजार ११० हेक्टरवरच केळी पिकाची लागवड आढळली, तर ४४ हजार ४१ हेक्टरवर पीकच आढळले नाही. त्यामुळे या क्षेत्रासाठी भरण्यात आलेला ३७ लाख ४३ हजारांचा विमा हप्ता जप्त करण्यात आला आहे. तर या पोटी राज्य सरकार १२३ कोटी ५३ लाख रुपयांचे, तर केंद्र सरकार ९३ कोटी ५८ लाख रुपयांचे अनुदान वाटणार आहे. या बनावट अर्जदारांविरोधात जिल्हाधिकाऱ्यांनी फसवणुकीचे गुन्हे दाखल करावेत, अशा सूचना कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दिल्या आहेत. दरम्यान, या योजनेत सर्वाधिक हिस्सा केळी पिकाचा त्यातही जळगाव जिल्ह्याचा असतो. एकूण अर्जापैकी निम्मे अर्ज याच जिल्ह्यातून केळी पिकासाठी असतात. मात्र, अन्य जिल्ह्यांतूनही असे प्रकार निदर्शनास आले आहेत. अशा अर्जदारांच्या प्रत्यक्ष पिकांची तपासणी केली जात असून, त्यांच्यावरही अशाच प्रकारची कारवाई करण्यात येईल, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

## जाणून घ्या उन्हाळी तीळ लागवड तंत्रज्ञान

तीळ हे प्राचीन काळापासूनचे महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. तीळ हे पीक ८५ ते ९० दिवसात येत असल्याने खरीप हंगामासोबत उन्हाळ्यातही तीळ पिकाची लागवड केली जात आहे. खरीप हंगामात मॉन्सूनच्या लहरीपणामुळे नुकसान होत असल्याने उन्हाळी हंगामातील तीळ लागवडीस प्राधान्य दिले जात आहे. उन्हाळी हंगामामध्ये पाण्याची हमखास सुविधा असलेल्या ठिकाणी तीळ लागवड फायदेशीर ठरते. सुधारित वाण आणि लागवड तंत्राचा अवलंब केल्यास उत्पादन चांगले मिळते.

हवामान :तीळ हे अत्यंत नाजूक व संवेदनशील पीक आहे. तापमान, सूर्यप्रकाश आणि वातावरणातील आर्द्रता यांचा पीक वाढीवर परिणाम होतो. उगवणीनंतर किमान तापमान १५ अंश सेल्सिअस, कायिक वाढीसाठी २१ ते २६ अंश सेल्सिअस, तर फुलधारणा अवस्थेत २६ ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक आहे. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलगळ होते. वाणानुसार फुल धारणेची सुरुवात होते. पीक प्रकाशाच्या कालावधीला संवेदनशील आहे. प्रकाशाचा कालावधी जास्त असल्यास बियाण्यातील तेलाचे प्रमाण वाढते, तर प्रथिनांचे कमी होते.जमीन : मध्यम ते भारी व उत्तम पाण्याचा निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. वालुकामय पोयट्याच्या जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास हे पीक चांगले येते. जमिनीचा सामू ५.५ ते ८.० इतका असावा.

पूर्वमशागत : तिळाचे बी आकाराने लहान असते. तसेच पिकाची सुरुवातीची वाढ ही हळू होते. त्यामुळे जमीन चांगली भुसभुशीत करून घट्ट दाबून घ्यावी. खोल नांगरट केल्यानंतर कुळवी करून जमीन भुसभुशीत करावी किंवा रोटाव्हेटरच्या



साह्याने जमीन तयार करावी. पेरणीपूर्वी जमिनीवर लाकडी फळी फिरवून जमीन दाबून सपाट करून घ्यावी. उगवण चांगली होण्यास मदत मिळते.

सुधारित वाण : तीळ हे पीक हवामानातील विविध घटकांस अतिशय संवेदनशील असल्यामुळे विभाग व हंगामनिहाय शिफारशीत वाणांची पेरणीसाठी निवड करावी. उन्हाळी तिळासाठी फुले पूर्णा, ए.के.टी.- १०१ या वाणांची लागवड करावी.

पेरणी कालावधी : उन्हाळी तीळ पिकाची पेरणी १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करावी. पेरणी शक्यतो बैल पाभरीने करावी. पाभरीने पेरणी करताना बियाणांमध्ये बारीक वाळू किंवा चाळून घेतलेले शेणखत मिसळावे. पेरणी ३० बाय १५ सें.मी. किंवा ४५ बाय १० सें.मी. अंतरावर करावी. पेरणी करताना बियाणे २.५ सें.मी. पेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलवर पडल्यास त्याचा उगवणीवर परिणाम होतो.विरळणी : पेरणीनंतर तीन आठवड्यांच्या आत विरळणी करावी. पिकाच्या योग्य वाढीसाठी व अधिक उत्पादन मिळविण्यासाठी रोपांची संख्या २.२२ लाख प्रति हेक्टर इतकी ठेवावी. त्यासाठी ४५ सें.मी. अंतरावर पेरणी केलेली असेल, तर दोन रोपांत १० सें.मी. अंतर ठेवून विरळणी करावी. पेरणी ३० सें.मी. अंतरावर केली असल्यास, दोन रोपांतील अंतर १५ सें.मी. इतके ठेवून विरळणी करावी.

खत व्यवस्थापन : शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ ते ६ टन प्रमाणे जमिनीत मिसळावे. किंवा हेक्टरी एक टन निंबोळी पेंड पेरणीबरोबर द्यावे. तीळ पिकास नत्र ५० किलो प्रति हेक्टर देण्याची शिफारस आहे. त्यापैकी नत्राची अर्धी मात्रा म्हणजेच २५ किलो नत्र पेरणीवेळी, तर उर्वरित अर्धी मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी द्यावी. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकास पाणी द्यावे. हेक्टरी २५ किलो स्फुरदाची मात्रा द्यावी. जमिनीत सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास, पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो गंधक किंवा झिंक द्यावे.अधिक उत्पादनासाठी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असताना, युरिया (२ टक्के) म्हणजेच युरिया २० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

आंतरमशागत : तिळाचे पीक सुरुवातीला फार हळू वाढते. रोपावस्थेत हे पीक अत्यंत नाजूक असून पिकाबरोबर वाढणाऱ्या तणांबरोबर पाणी, अन्नद्रव्यांसाठी स्पर्धाक्षम असते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात तण नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी व निंदणी करावी. तर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. गरजेनुसार निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे.

पाणी व्यवस्थापन : तीळ पीक पाण्यासाठी फारच संवेदनशील आहे. तिळाचे पीक हे पाण्याचा ताण सहन करणारे असले तरी उन्हाळी हंगामात पाण्याचा ताण पडू देऊ नये. पीक उगवणीसाठी जमिनीत पुरेशी ओल असणे आवश्यक आहे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पिकास फुले येण्याच्या तसेच बोंडे धरण्याच्या वेळेस पाण्याचा ताण पडू देऊ नये.




### जागतिक दिवस
### वॅलेन्टाइन्स डे

### महत्वाच्या घटना

१६२८ : आजच्या दिवशी मुघल सम्राट शाहजहा आग्र्या च्या गादीवर बसला.
१८७६ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल व एलिशा ग्रे यांनी एकाच दिवशी टेलिफोनच्या पेटंटसाठी अर्ज केला.
१८८१ : भारतातील पहिल्या होमिओपाथिक कॉलेजची कोलकाता येथे स्थापना
१८९९ : अमेरिकेत निवडणुकांसाठी मतदान यंत्रे वापरण्यास सुरूवात झाली.
१९२० : अमेरिकेच्या शिकागो येथे महिला मतदारांच्या लीग ची स्थापना करण्यात आली.
१९२४ : संगणक तयार करणारी कंपनी आय.बी.एम ची स्थापना.
१९४५ : चिली, इक्वेडोर, पॅराग्वे व पेरू या देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९४५ : दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्स च्या विमानांनी तुफानी बॉम्बफेक करुन जर्मनीतील ड्रेस्डेन शहर बेचिराख केले.
१९४६ : बँक ऑफ इंग्लंडचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९४६ : पहिला संगणक 'एनियाक' युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनियात प्रदर्शित करण्यात आला.
१९६३ : अणुक्रमांक १०३ असलेले लॉरेन्सिअम हे मूलद्रव्य प्रथमच तयार करण्यात आले.
१९८९ : ईराणच्या आयातोल्ला खोमेनीने ब्रिटिश लेखक सलमान रश्दीच्या खूनाचा फतवा काढला.
१९८९ : भोपाळ दुर्घटनेबद्दल भारत सरकारला ४७,००,००,००० अमेरिकन डॉलर नुकसान भरपाई देण्याचे यूनियन कार्बाईडने कबूल केले.
२००० : अभिजित कुंटे हा भारताचा चौथा आणि महाराष्ट्राचा दुसरा ग्रँडमास्टर बनला.
२००३ : नाटककार महेश एलकुंचवार यांची के.के. बिर्लाफांउंडेशनतर्फे दिल्या जाणार्या सरस्वती सन्मानासाठी निवड
२००५ : आजच्या दिवशी यु ट्यूब ची स्थापना करण्यात आली.
२००६ : आजच्या दिवशी सद्दाम हुसेन न्यायधीशांच्या विरोधात उपोषणावर बसले.
२००९ : सानिया मिर्झा चा आजच्या दिवशी पट्टाया ओपन टेनिस च्या अंतिम फेरीत प्रवेश.
२०१९ : ला आतंकवाद्यांनी पुलवामा येथे केंद्रीय बलाच्या सैनिकांची वाहतूक करणाऱ्या ताफ्यावर बॉम्बस्फोट घडवून आणला, त्यामध्ये ४० सैनिक शहीद झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८३ : बाबर पहिला मुघल सम्राट, हिन्दुस्थानातील मुघल सत्तेचा संस्थापक (मृत्यू: २६ डिसेंबर १५३०)
१९१४ : जान निसार अख्तर ऊर्दू शायर व गीतकार (मृत्यू: ९ ऑगस्ट १९७६)
१९१६ : संजीवनी मराठे कवयित्री (मृत्यू: १ एप्रिल २०००)
१९२५ : मोहन धारिया केन्द्रीय मंत्री व सामाजिक कार्यकर्ते (मृत्यू: १४ आक्टोबर २०१३)
१९३३ : मुमताज जहाँ बेगम देहलवी ऊर्फ मधुबाला अभिनेत्री (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९६९ मुंबई)
१९५० : कपिल सिबल वकील आणि केंद्रीय मंत्री
१९५२ : भारतीय जनता पार्टी च्या महिला राजनीतिज्ञ तसेच केंद्रात मंत्री राहिलेल्या सुषमा स्वराज यांचा जन्म.
१९६० : पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित निरंजनानंद सरस्वती यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४०५ : तैमूरलंग मंगोलियाचा राजा (जन्म: ८ एप्रिल १३३६)
१९६४ : भारतीय प्रशासन अधिकारी वी.टी. कृष्णमाचारी यांचे निधन.
१९७४ : श्रीकृष्ण नारायण रातंजनकर आग्रा घराण्याचे गायक, शास्त्रीय संगीताचे गाढे अभ्यासक व संगीत गुरू (जन्म: १ जानेवारी १९००)
१९७५ : ज्यूलियन हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ (जन्म: २२ जून १८८७)
१९८० : भारतीय चित्रपट दिग्दर्शक मनहर रसकपूर यांचे निधन.
१९९५ : इंग्लिश लेखक पी. जी. वूडहाऊस यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १८८१)
२००५ : हिंदी साहित्यकार तसेच प्रसिद्ध लेखक विद्यानिवास मिश्र यांचे निधन.
२००७ : मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री श्यामाचरण शुक्ल यांचे निधन.

## लेमन ग्रासची शेती करून मिळवू शकता मोठा नफा

सध्याच्या काळात शेतकरी विविध प्रकारे नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन पिकांचे प्रयोग करताना दिसत आहेत. ज्यातून त्यांना चांगला नफाही मिळतो आहे. असेच एक पीक म्हणजे लेमन ग्रास होय. याचा वापर बहुतांशी कॉस्मेटिक, डिटर्जंट, आणि औषधांमध्ये केला जातो. कमी कालावधी मध्ये तयार होणाऱ्या या पिकाला सध्या चांगली मागणी आहे. औषधी वनस्पती असल्याने याचे बरेच उपयोग आहेत. योग्य तंत्राचा वापर करून या पिकाची लागवड केल्यास चांगला नफा मिळू शकतो. तसेच यासाठी लागणारी गुंतवणूकही कमी असते. याची लागवड केल्यानंतर चार महिन्यांमध्येच हे पीक तयार होते. औषधांसोबतच या पिकापासून बनवलेल्या तेलाला देखील बाजारात चांगली मागणी आहे आणि किमतही चांगली मिळते. या पिकाच्या शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे या पिकासाठी कोणत्याही प्रकारच्या खताची आवश्यकता भासत नाही. आणि हे पीक एकदा पेरले की पाच ते सहा वर्षापर्यंत ते चालते. याची पेरणी फेब्रुवारी ते जुलै च्या दरम्यान करता येते. एकदा याची पेरणी केली की, पाच ते सहा वेळा याची कापणी करता येते. यापासून तयार केल्या जाणाऱ्या तेलाची किंमत हजार ते दीड हजार रु लिटर अशी असते. एका एकरातून साधारण ५ ते ६ लिटर तेल निघते.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# घोडेगावात गोळीबारानंतर नगरच्या रुग्णालयात राडा

## दोन्ही गटाचे समर्थक समोरासमोर आल्याने तणाव, दोन जण ताब्यात



अहिल्यानगर। प्रतिनिधी

घोडेगावात दोन गटांत झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर दोन्ही गटातील जखमींना शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी दोन्ही गटाचे समर्थक समोरासमोर आल्याने तणाव निर्माण झाला. यावेळी झालेल्या राड्यात रुग्णालयातच एकाला जमावाने मारहाण केली. त्यामुळे रुग्णालयातही गोंधळ उडाला. तेथील सुरक्षारक्षकांनी वाद सोडवला. दरम्यान, पोलिस फौजफाटा दाखल झाल्यावर जमावाला पांगवण्यात आले.

जुन्या वादातून घोडेगावातील एका रुग्णालयात नितीन शिरसाठ याच्यावर गोळीबार झाला. दुसऱ्या गटातील सूरज फुलमाळी याच्यावरही गोळी झाडण्यात आली. या घटनेनंतर जखमी फुलमाळी याला उपचारासाठी अहिल्यानगरच्या तारकपूर परिसरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर १० मिनिटातच जखमी शिरसाठ यालाही त्याच रुग्णालयात आणण्यात आले. यावेळी फुलमाळी टोळीचा सदस्य समोर दिसताच शिरसाठ समर्थकांचा संताप अनावर झाला. त्यांनी त्याला तेथेच घेराव घालून मारहाण केली.

शिरसाठ यांचा मृत्यू झाल्याचे समोर येताच तणाव वाढला. सुरक्षा रक्षकांनी जमावाला बाहेर काढले. याच दरम्यान पोलिस फौजफाटा दाखल झाल्यावर परिस्थिती नियंत्रणात आली. रुग्णालयातून टोळक्याच्या सूचना, गोपनीय माहितीमुळे अनर्थ टळला मृत शिरसाठ याच्या समर्थकांनी रुग्णालयात गर्दी केली होती.

यातून एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता होती. मात्र, रुग्णालयाच्या सुरक्षारक्षकांनी दाखवलेली तत्परता व केलेला हस्तक्षेप, तसेच वेळेत पोलिस फौजफाटा घटनास्थळी दाखल झाल्याने तेथील अनर्थ टळला. तसेच, एका टोळक्याने रुग्णालयातूनच फोनवरून घोडेगावात तणाव निर्माण होईल असे कृत्य करण्याच्या सूचना दिल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली आणि पोलिसांनी तात्काळ हालचाली करत दोघांना ताब्यात घेतल्याने तेथील संभाव्य घटनाही टळली. पोलिसांनी धाव घेत स्थिती नियंत्रणात आणली रुग्णालयात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याने पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय अधिकारी दिलीप टिपरसे, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी, तोफखाना पोलिस ठाण्याचे निरीक्षक जगदीश भांबळ, सायबर शाखेचे सागर ढिकले, भिंगार कॅम्पचे जगदीश मुलगीर आदींनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आल्याचे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.

## वाळू वाहतूक वाहनावर आरटीओ पथकाची कारवाई



जालना। प्रतिनिधी

११ व १२ फेब्रुवारी जिल्हाधिकारी मा.अशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रमोहन चिंतल यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांच्या वायुवेग पथकाने अवैध गौण खनिज वाहतुकीविरुद्ध विशेष तपासणी मोहीम राबविली. जालना जिल्ह्यातील संपूर्ण परिसरात करण्यात आलेल्या तपासणीत वीस वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली असून एकूण सुमारे रुपये ३,९३,५००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. तपासणीदरम्यान विनानंबर प्लेट टिप्पर व विनापरवाना वाळू वाहतूक करणारी वाहने आढळून आली. तसेच विनापरवाना वाळू वाहतूक करणारे एक वाहन जप्त करून ते टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले आहे. संबंधित वाहनांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेत मोटार वाहन निरीक्षक श्री भीमराज नागरे, श्री अनिल कदम, श्री. निलेश अहिरे, श्री. शुभम मोटे व श्री. अक्षय पाटील , सहा मोटर वाहन निरीक्षक श्रीमती सोळुंके, श्री राजपूत, श्री अर्शन खान व चालक घुले, पारिस्कर, निळे, कोकरे, देवकर यांनी सहभाग नोंदविला. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रमोहन चिंतल यांनी अवैध वाहतुकीविरुद्ध महसूल विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभागाची संयुक्त कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहील, असा इशारा दिला आहे.

# स्वच्छता, विकासकामांचे फलक घेवून घोषणाबाजी

## पहिल्या सभेपूर्वी काँग्रेस नगरसेवकांचे आंदोलन



नळदुर्ग। प्रतिनिधी

नळदुर्ग नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या अध्यक्षतेखाली १२ फेब्रुवारी रोजी पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, सभा सुरू होण्यापूर्वी काँग्रेसच्या १० नगरसेवकांनी नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावरील पायऱ्यावर शहरातील स्वच्छतेसह विविध प्रश्नांवर लक्ष वेधण्यासाठी हातात फलक घेऊन घोषणाबाजी करत आंदोलन केले. नगरपालिकेच्या इतिहासात सर्वसाधारण सभा सुरू होण्यापूर्वी अशा प्रकारे आंदोलन होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

नळदुर्ग नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर तब्बल एक महिन्याहून अधिक कालावधीनंतर नगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा १२ फेब्रुवारी रोजी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या सभेत नळदुर्ग शहराच्या पर्यटनवाढीसाठी पंचवार्षिक आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्याबाबत विचारविनिमय करणे, यासह अनेक महत्वाचे प्रश्न विचारविनिमयासाठी ठेवण्यात आले होते. मात्र, सकाळी १०.३० वाजता सर्वसाधारण सभा सुरू होण्यापूर्वी काँग्रेसच्या सर्व १० नगरसेवकांनी नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर घोषणाबाजी करत आंदोलन केले. या आंदोलनात त्यांनी शहरातील स्वच्छतेसाठी तीन टप्प्यांमध्ये घनकचरा निर्मूलन करणाऱ्या कंपनीचा टेंडर रद्द करावा, दिवाबत्ती लावावी आणि अंधार दूर करावा अशा मागण्या फलकांवर मांडल्या. आंदोलन करणाऱ्यांमध्ये काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, नगरसेवक इमाम शेख, आकाश कुलकर्णी, सुधीर पोतदार, अब्दुल गफुर कुरेशी, नगरसेविका अपर्णा बेडगे, सय्यद जुलेखा इनामदार, कमल गायकवाड, मन्नाबी कुरेशी, मदीना बागवान यांचा समावेश होता. नगरसेवकांत खडाजंगी होण्याची शक्यता नगरसेवकांनी नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावरच मोठ्या प्रमाणावर घोषणाबाजी करत हे आंदोलन केले. नळदुर्ग नगरपालिकेच्या ७० वर्षांच्या इतिहासात सर्वसाधारण सभा सुरू होण्यापूर्वी नगरसेवकांनी अशा प्रकारचे आंदोलन केलेली ही पहिलीच घटना आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या सभागृहात विविध विकासकामांच्या संदर्भात सत्ताधारी भाजप-शिवसेना आणि काँग्रेसच्या नगरसेवकांमध्ये खडाजंगी होण्याची शक्यता दिसून येत आहे.

# पोलिस पाटील भरतीत पारदर्शकतेसाठी पॅनल बदलीचा फंडा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा निर्णय, भुलथापांना बळी न पडण्याचे आवाहन

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यांमधून पोलिस पाटलांच्या रिक्त असलेल्या पदांसाठी मुलाखती सुरु करण्यात आल्या आहेत. या मुलाखतीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी मुलाखतीचे पॅनल दररोज बदलण्याचा फंडा राबविला जात आहे. तर या मुलाखत प्रक्रियेवर जिल्हाकिारी राहुल गुप्ता यांचे पथक लक्ष ठेऊन असल्याचे चित्र आहे. हिंगोली जिल्ह्यातील तीन उपविभागांतर्गत पाच तालुक्यातून पोलिस पाटलांच्या रिक्त असलेल्या पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अप्पर



जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, विकास माने, समाधान घुटुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हि भरती घेतली जात आहे. या भरती प्रक्रियेत लेखी परिक्षा झाल्यानंतर सुमारे १९७० उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले आहे. गुरवार पासून ता. १२ जिल्हाधिकारी कार्यालयात या मुलाखतींना सुरवात झाली आहे.

दरम्यान, तीन उपविभागांतर्गच पाच तालुक्यातील पात्र उमेदवारांना त्यांना दिलेल्या दिवशी आवश्यक कागदपत्रे घेऊन हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वसमत उपविभागातील मुलाखती ता. १८ फेब्रुवारीपर्यं तर कळमनुरी तालुक्यातील मुलाखती ता. २० फेब्रुवारी तर हिंगोली तालुक्यातील मुलाखती ता. २३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहेत. या भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता रहावी तसेच योग्य उमेदवारांची निवड होण्यासाठी मुलाखतीसाठी दररोज अधिकाऱ्यांचे पॅनल बदलण्याचा फंडा राबविला जात आहे. यामध्ये कोणत्या अधिकाऱ्यांच्या पॅनलकडून कोणत्या तालुक्यातील उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जातील हे अधिकाऱ्यांना आदल्या दिवशी रात्री कळविले जात आहे. या शिवाय भरतीप्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक होत असून उमेदवार किंवा त्यांच्या नातेवाईकांनी कोणाच्याही भुलथापांना बळीपडून आपले नुकसान करून घेऊ नये असे आवाहन जिल्हाधिकारी गुप्ता यांनी केले आहे.

## मारवाडी युवा मंचकडून तहसीलमध्ये पाणी फिल्टर लावले



अंबड। प्रतिनिधी

अखिल भारतीय मारवाडी युवा मंच अंबड शाखा तर्फे तहसील कार्यालय अंबड येथे जल हेच जीवन या उद्देशाने तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी चे पाणी फिल्टर बसवण्यात आले यावेळी फिल्टर चे उदघाटन तहसीलदार श्री विजय चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित सहाय्यक महसूल अधिकारी उद्धव मिसाळ, मंडळ अधिकारी राजपूत, मारवाडी मंच महाराष्ट्र राज्य प्रांती अध्यक्ष कैलास शेठ राठी ,अंबड शाखेचे अध्यक्ष संतोषजी जोशी. उपाध्यक्ष राम दिपक पटवारी सचिव शुभम जोशी प्रांतीय संयोजक वृक्षारोपण राहुल अग्रवाल मुख्याध्यापक जैन इंग्लिश स्कूल नंदकिशोर भारवदाज (भारतवाल) सर सेवानिवृत्त मंडळ अधिकारी शिवाजी गाडेकर शाखेचे सदस्य सागर सोमानी,संदीप भैया जाजू अरुण शर्मा,विवेक गिल्डा, गोपाल गिल्डा भूषण काला,श्याम कवडे हे सर्व उपस्थित होते.

# अहमदपूर तालुक्यात ३ रेश्टर स्केलचा भूकंप

## महात्मा गांधी महाविद्यालयाच्या वेधशाळेमध्ये नोंद

अहमदपूर। प्रतिनिधी

येथील महात्मा गांधी महाविद्यालयात अद्ययावत भूकंप वेधशाळा यंत्रणेची सुविधा उपलब्ध केली असून, भूगोल विभागातील या सुसज्ज भूकंप वेधशाळेमध्ये दि. ११ फेब्रुवारी राजी दुपारी ३.२० वाजता ३.०० रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याची नोंद दिसून आली आहे.



सदरील इमेजमध्ये ए.एच.एम.डी- १२३ नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील खपराळ हे गाव भूकंपाचे केंद्र असल्याचे दिसून आले आहे. तसेच या भूकंपाची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे. मुखेड तालुक्यातील खपराळ, हिब्बट, धनज, जामखेड, चोंडी अशा अनेक ठिकाणी या भूकंपाचे धक्के बसल्याचे दिसून आले आहे.

सदरील भूकंप वेधशाळेतील भूकंप यंत्रणेवरील नोंद पाहण्यासाठी विचार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. व्ही. पी. पवार, भूगोल विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. नितीन देशमुख, प्रसिद्धी प्रमुख डॉ यादव सूर्यवंशी, डॉ. राजेश जोंधळे, कार्यालयीन अधीक्षक श्री. विशाल करंजे आदी उपस्थित होते. या यंत्रणेमुळे अहमदपूर परिसरातील लोकांना सदरील वेधशाळेचा उपयोग होणार आहे. ही वेधशाळा आणण्यासाठी महात्मा गांधी महाविद्यालयाचे भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ नितीन देशमुख यांनी प्रयत्न केल्यामुळे आणि ते भूकंपाचे अद्ययावत यंत्र या महाविद्यालयात आणले असल्यामुळे डॉ. नितीन देशमुख यांचे सर्व मंडळाच्या वतीने व प्राचार्यांच्या वतीने कौतुक केले जात आहे.

# महिलांच्या नेतृत्वात आता निघणार शोभायात्रा

## महाशिवरात्रीनिमित्त श्री नवयुवक मानाची कावड यात्रा मंडळातर्फे आयोजन

खामगाव। प्रतिनिधी

ऐतिहासिक श्री नवयुवक मानाची कावड यात्रा मंडळाच्या वतीने महाशिवरात्रीच्या पर्वावर रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी शहरात शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी ही शोभायात्रा महिलांच्या नेतृत्वात काढण्यात येणार असून, यामध्ये शेकडो महिला सहभागी होणार आहेत. श्री नवयुवक मानाची कावड यात्रा मंडळाच्या वतीने रविवारी तीर्थक्षेत्र नागझरी येथून पवित्र जल आणण्यात येणार आहे. सकाळी ७ वाजता राठी प्लॉट भागातील जय शिव शंभो महादेव मंदिरात जलाभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर शहरातील पाच मुख्य श्री महादेव मंदिरात जलाभिषेक करण्यात येणार आहे.

दुपारी १२ ते ३ या वेळेत शिव आराधना व भजन, दुपारी ३ ते सायंकाळी ६



वाजतादरम्यान राठी प्लॉट, दाल फैल भागातील शिव मंदिरात फराळ व दुधवाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर, युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषीकेश जाधव, भाजपचे गटनेते विजय उगले, शिवसेना नेते अमोल अंधारे, नगरसेवक राकेश राणा, शिवसेना जिल्हा उपप्रमुख संजय अवताळे, श्री संत गजानन महाराज मंदिराचे अध्यक्ष राज देशमुख आदींच्या हस्ते महाआरती करण्यात येणार आहे. त्यानंतर शोभायात्रेला सुरुवात होणार आहे. शोभायात्रेत भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री नवयुवक मानाची कावड यात्रा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राहुल कळमकार यांनी केले आहे.

सोहळ्यानिमित्त महिला कार्यकारिणी गठीत महाशिवरात्री उत्सवासाठी संगीता शिराळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची कार्यकारिणी तयार करण्यात आली. यावेळी राहुल कळमकार, राज देशमुख, प्रल्हाद ढोले, शंकर खिरडकर, उत्तम धारतरकर, सुनिल बोडखे उपस्थित होते. या कार्यकारिणीत अध्यक्षपदी छाया कोरकणे, उपाध्यक्षा नेहा खुळे, सचिव दीपा मानेकर, सहसचिव पूनम देशमुख, सल्लागार प्राची खोपाले, कोषाध्यक्षा प्रमिला मोरे, प्रमुख लिला मोरे, सदस्यपदी नर्मदा मोरे, अलका मोरे यांचा समावेश करण्यात आला.

## शेतकऱ्यांना अनुदान देण्यासह विविध मागण्यांसाठी कन्नडमध्ये उपोषण सुरू



कन्नड। प्रतिनिधी

कोळवाडी आणि सितानाईक तांडा येथील रंजना काळे आणि संगीता जाधव या उमेद योजनेअंतर्गत २०१६ पासून काम करत होत्या. २०१६ ते २०१८ या काळात त्यांच्याकडून विनामोबदला काम करून घेतले. २०१८ पासून त्यांना नियुक्ती देण्यात आली. मात्र २०२२ पासून कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना कामावरून कमी करण्यात आले. त्यानंतरचे मानधनही देण्यात आलेले नाही. या महिलांना पुन्हा कामावर घ्यावे आणि थकीत वेतन द्यावे, या मागणीसह इतर मागण्यांसाठी जनशक्ती शेतकरी संघटनेने बुधवारपासून (दि.११) कन्नड तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, मागील अनेक वर्षांपासून पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. त्यामुळे उपोषणाचा निर्णय घेण्यात आला. उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, इंदिरा आवास योजना, बांधकाम कामगार घरकुल योजना, रमाई घरकुल योजना आणि शबरी माता घरकुल योजनांची माहिती, शासकीय परिपत्रके, आदेश आणि अंमलबजावणी याबाबत माहिती द्यावी. श्रावण बाळ आणि संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभार्थी निवड आणि शासन निर्णय याची माहितीही द्यावी, आदी मागण्यांसाठी अशोक पवार, आलमदार जाफरी, गीताराम व्होलप, ज्ञानेश्वर थोरात, त्र्यंबक भवर, रामचंद्र सोनवणे आदी उपोषण करीत आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र



# राष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक 'महा पशुधन एक्सपो'चे परळीत उद्घाटन

## ग्रामीण तरूणांना उद्योजक बनण्याची संधी-ना.पंकजाताई मुंडे



परळी वै. । प्रतिनिधी

**महाराष्ट्र हे पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे पहिले राज्य ठरलेले आहे. आपले अनुकरण आता देशातील अनेक राज्ये करत आहेत. पशुसंवर्धनासाठी तीन लाखांपर्यंत व्याजावर अनुदान, सौर ऊर्जेसाठी सबसिडी, वीज बिलात सवलत अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील. पशुसंवर्धनातून उन्नती हे ध्येय निश्चित करून अधिकाधिक रोजगार निर्मिती करण्याच्या दृष्टीने अनेक योजना पशुसंवर्धन विभागाच्या वतीने कार्यान्वित करत आहोत. हा एक्सपो ग्रामीण तरूणांना उद्योजक बनण्याची एक संधी असून प्रत्येकानं प्रदर्शनाला भेट देऊन माहिती घ्यावी आणि पशुपालनाच्या उद्योगासाठी सज्ज व्हावे असे आवाहन राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.**

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन दिवसीय ऐतिहासिक 'महापशुधन एक्सपो'चे उद्धाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज वैद्यनाथ महाविद्यालया समोरील ओपळे मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडले, त्यावेळी त्या बोलत होत्या. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी, पशुसंवर्धन आयुक्त डॉ.प्रवीण कुमार देवरे,अतिरिक्त आयुक्त डॉ. मुकणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ नितीन पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, मी ग्रामविकास मंत्री, बीडची पालकमंत्री असताना बीड जिल्ह्यामध्ये जो निधी कधी कोणाला माहिती नव्हता अशा २५ १५ निधीतून प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर कामे केली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलयुक्त शिवार, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या इमारती उभ्या केल्या. माझा जिल्हा दुष्काळी आहे, मागासलेला आहे असे म्हणून स्वस्थ बसून चालणार नाही तर याउलट लोकांसाठी कामे करण्याची मोठी संधी आपण यातुन बघितली पाहिजे. त्यादृष्टीनेच पशुसंवर्धन मंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा आपण या ठिकाणी साडे पाचशे कोटीचे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले. ज्यावेळी बारामतीसाठी पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याचा प्रस्ताव अजितदादांनी दिला.त्यावेळी मी बीड जिल्ह्यासाठी परळीत हे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले. अजितदादांनी यासाठी निधी मंजूर केला. पशुसंवर्धन मंत्री या नात्याने देशातील ऐतिहासिक महा पशुधन एक्सपो आपल्या जिल्ह्यात व्हावा, आपल्या पान २ वर

# झिम्बाब्वेची कमाल आस्ट्रेलियाला हरवले आता भारत-पाकिस्तान लढतीकडे लक्ष

**काल भारतीय संघाने त्यांच्या लौकिकाला साजेसा खेळ केला पण तरी अलीकडे सलामीचे फलंदाज मैदानात उतरले की, 'चलो कुछ तुफानी करते है' च्या मूडमध्ये असतात तसं काही केलं नाही,कदाचित पहिल्या यूएस विरुद्धच्या सामन्यातील अनुभवावरून घेतलेला धडा असावा.क्रिकेट हा मुळात यंत्रवत खेळ नाही, जसे ठरवले तसेच होते असे नाही, तसे असते तर आज आस्ट्रेलियाला झिंबाब्वेकडून पराभव नसता स्वीकारावा लागला पण आज असे झाले आहे हे खरे आहे. म्हणून कोणत्याही संघाला इथे कमी लेखून चालत नाही.**

नवी दिल्लीतील भारत-नामीबिया सामन्यापूर्वी भारत २५०-२७५ धावा करेल असा अंदाज बांधला जात होता पण प्रत्यक्षात तसे झाले नाही,२०० चा टप्पा ओलांडला हे निश्चित कौतुकास्पद होते पण तरी वाटत होते होतीलही २५० पण नाही झाले. असो.भारताने नामिबियावर ९३धावांनी दणदणीत विजय मिळवला. टी-२० विश्वचषक इतिहासात धावांच्या बाबतीत भारताने मिळवलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय आहे, या विजयामुळे भारतीय संघ 'अ' गटात अव्वल स्थानी पोहोचला . अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या हार्दिक पांड्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने २८ चेंडूंत ५२ धावांची वेगवान खेळी केली आणि २१धावा देऊन २ बळीही टिपले ईशान किशनने सुरवातीला खेळपट्टीचा अंदाज घेतला आणि मग गियर बदलला. (२४ चेंडूंत ६१ धावा) आणि संजू सॅमसन पण चांगला खेळत होता पण एक अधुऱ्या मनाने खेळलेल्या फ्लिकने त्याचा घात केला. ईशानने अवघ्या २० चेंडूंत अर्धशतक झळकावत नामिबियाच्या




वेगवान गोलंदाजांवर तुफान हल्ला चढवला. संजू सॅमसनने ८चेंडूंत २२ धावांची भर टाकली आणि ८ व्या षटकापर्यंत भारताने ११६ धावांचा टप्पा ओलांडला होता. मात्र, मधल्या षटकांत नामिबियाच्या फिरकीपटूंनी भारतीय फलंदाजवर नियंत्रण मिळवले. कर्णधार सुर्यकुमार यादव लवकर बाद झाल्यावर हार्दिक पांड्याने आक्रमक फलंदाजी करत भारताला २०० पार नेले, तरीही अखेरच्या ११चेंडूंमध्ये भारताने अवघ्या ४ धावांत ५ गडी गमावले. विशेषतः फिरकीला मदत करणाऱ्या या खेळपट्टीवर भारतीय फलंदाज बाद होण्याचे प्रमाण चिंताजनक होते.नामिबियाच्या गोलंदाजीमध्ये कर्णधार गेरहार्ड इरास्मसने सर्वाधिक प्रभाव पाडला. त्याने आपल्या ४ षटकांत केवळ २० धावा देत ४ महत्त्वाचे बळी घेतले. वेगवान गोलंदाजांनी १० पेक्षा जास्त सरासरीने धावा दिल्या असताना, इरास्मस आणि बर्नाड शोल्ट्झ या फिरकी जोडीने भारताच्या धावगतीला लगाम लावला.भारतीय गोलंदाज मात्र कमालीचे फार्मात आहेत ,विशेषतः मिस्ट्री स्पिनर वरून चक्रवर्ती,त्याने या सामन्यावर भारताचे एकतर्फी नियंत्रण मिळवले (७ धावत ३ बळी ) आणि मग अक्षर पटेल (२० धावात २) ,हार्दिक पंड्या (२१ धावात २ )आणि बुमराह व अर्षदीपसिंगच्या प्रत्येकी एक बळीने नामीबिया संघ १८.२ षटकात ११६ धावात आटोपला.सलामीचे स्टीनकॅम्प (२९ ) फ्रायलिंक ,(२२ ) वगळता कोणताही फलंदाज सन्मानजनक धावा नाही करू शकला. या सामन्यात भारतीय फलंदाजांच्या फिरकीसमोरच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. चेंडू खेळपट्टीवर थांबून येत असताना सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांना झालेली अडचण आणि रिंकू सिंगची स्वस्तात गेलेली विकेट यामुळे भारताची फिरकीसमोरची तांत्रिक कमजोरी पुढे आली. आता उद्या पाकिस्तान विरुद्ध कोलंबोत फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर भारतीय संघ खेळणार आहे.पाकिस्तान संघ तेथे ५ फिरकी गोलंदाज घेऊन खेळत आहे.या सामन्यापूर्वी आणि सुपर एट मधल्या मोठ्या सामन्यांपूर्वी ही फिरकी समोर फलंदाजी करण्याची समस्या सोडवणे भारतासाठी गरजेचे झाले आहे. आज आस्ट्रेलियाला झिम्बाब्वे संघाने २३ धावानी हरवत खळबळ उडवून दिली. प्रथम फलंदाजी करीत झिम्बाब्वेने २ बाद १६९ धावा केल्या,प्रत्युत्तरात आस्ट्रेलियाला त्यांनी १९.३ षटकात १४६ धावात बाद केले.ब्लेसिंग मुझरबानी ने १७ धावात ४ बळी घेत हा ऐतिहासिक विजय साकार केला.आता कुठे खरे क्रिकेट सुरू झाले आहे,खरा संघर्ष तर पुढे आहे.

**– महेश वाघमारे,बीड**

# आष्टीत वरिष्ठ दिवाणी न्यायालयाचे ऐतिहासिक उद्घाटन

## स्थानिक पातळीवर न्याय मिळण्याचा मार्ग सुकर; तालुक्यासाठी मोठी न्यायिक क्रांती

आष्टी । पतिनिधी

आष्टी तालुक्याच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा ऐतिहासिक क्षण शनिवारी, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी साकारत आहे. तालुक्यात प्रथमच स्थापन होणाऱ्या दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) न्यायालयाचे उद्धाटन सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात व शासकीय मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या न्यायालयामुळे आष्टी तालुक्यातील नागरिकांना वरिष्ठ स्तरावरील न्यायासाठी जिल्हा मुख्यालयाची धावपळ करण्याची गरज उरणार नसून न्यायप्रवेश अधिक सुलभ होणार आहे.

या न्यायालयाचे उद्धाटन मुंबई उच्च न्यायालय चे न्यायमूर्ती किशोर संत यांच्या शुभहस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून न्यायमूर्ती रविंद्र जोशी उपस्थित राहणार असून बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. न्यायव्यवस्थेतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रम आष्टी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय परिसरात आयोजित करण्यात आला असून संपूर्ण न्यायालयीन परिसर सजविण्यात येत आहे. तालुक्यातील वकील, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.आष्टी तालुक्यातील नागरिकांना पान २ वर

# नवगण राजुरी गावातून सर्व एसटी बसची ये-जा

## मात्र पाटोदा तालुक्याचे ठिकाण व बसस्थानक असतानाही वंचित, हे पाटोद्याचे भाग्य की दुर्भाग्य?

पाटोदा । प्रतिनिधी

नवगण राजुरी गावातून बहुतांश एसटी बसांची नियमित ये-जा होत असताना पाटोदा तालुक्याचे ठिकाण असलेल्या पाटोदा शहरात मात्र थेट बससेवेपासून वंचित राहावे लागत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. अधिकृत बसस्थानक असूनही अनेक गाड्या चुंबळी फाट्यावरून मार्गक्रमण करत असल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पाटोदा येथे तहसील कार्यालय, पंचायत समिती, न्यायालय, ग्रामीण रुग्णालय, शासकीय व खासगी बँका तसेच शैक्षणिक संस्था आहेत. विविध शासकीय कामांसाठी दररोज तालुक्यातील नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र एसटी बस थेट बसस्थानकात न आल्याने प्रवाशांना चुंबळी फाट्यावर उतरून खासगी वाहनांचा आधार घेऊन शहरात यावे लागते. त्यामुळे वेळ व खर्च दोन्ही वाढत आहे.विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्गाला या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे. काही वेळा सायंकाळी बस न मिळाल्याने नागरिकांची गैरसोय होते. पान २ वर



**आष्टी: रब्बी हंगामात ज्वारी काढणी करताना शेतात मजुर यंदा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर कांदा पीक असल्याने ज्वारीचे पीक कमी प्रमाणात आहे त्यामुळे गत वर्षी ज्वारी जनावरांना चाऱ्यासाठी लागणारा कडबा याचे देखील भाव गतवर्षी कडाडलेली असतील.( छाया: शरद रेडेकर)**

## पाटोदा येथील राज मोहम्मद चौकातील वाहतुक कोंडीचे नियोजन करा-ॲड.विशाल मस्के

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौक हा रहदारीचा चौक असुन १) पारगांव रोड, २) महासांगवी रोड, ३) बीड, मांजरसुंबा मार्गे येणारा मुख्य रोड, ४) पाटोदा शहराचे बाजारतळातुन येणारा मुख्य रोड असे प्रमुख रस्ते या चौकात येऊन मिळतात.

जामखेड ते सौताडा मार्गे चुंबळीफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सद्यस्थितीत चालु असल्याने बीड व मांजरसुंबा मार्गे जामखेड कडे येणारी व जाणारी बरीचशी वाहने ही या चौकातुन पान २ वर

# थोर स्वातंत्र्यसेनानी स्व.थोरवे दादा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त हरिनाम सप्ताहास प्रारंभ


आष्टी । प्रतिनिधी

स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणारे, समाजहितासाठी आयुष्य वेचलेले थोर स्वातंत्र्यसेनानी परमपूज्य वै.साहेबराव थोरवे दादा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणा निमित्त आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह,भागवत मूलसंहिता वाचन पारायण, श्रीमद्भागवत गीता पारायण तसेच होम-हवन यज्ञ अशा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.हा भक्तिमय सोहळा गुरुवार दि.१२ ते दि.१९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात संपन्न होणार आहे.या सप्ताहात सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड भागवत मूलसंहिता गीता पारायण चालणार असून, यासोबतच विधिपूर्वक यज्ञ (होम-हवन),मंत्रोच्चार, अभिषेक व इतर धार्मिक विधी पार पडणार आहेत.या धार्मिक विधींचे पौरोहित्य सुप्रसिद्ध वेदमूर्ती यज्ञेश्वर जोशी (नांदेड) हे करणार असून,त्यांच्या विद्वत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे हा सप्ताह अधिक फलदायी ठरणार आहे.या सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ७ ते ९ या वेळेत वेदमूर्ती यज्ञेश्वर जोशी (नांदेड) यांचे सुमधुर व भावस्पर्शी कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या कीर्तनातून भक्ती, ज्ञान व वैराग्याचा त्रिवेणी संगम अनुभवण्याची संधी भाविकांना पान २ वर



# वेदशास्त्र संपन्न किरण गुरु गोसावी यांना पितृशोक

माजलगाव । प्रतिनिधी



मोगरा येथील प्रतिष्ठित नागरिक अत्यंत धार्मिक, मनमिळावू स्मित भाषी समाजसेवक अरुण काका गोसावी वय ६५ वर्षे यांचे दिनांक १३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास परभणी येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू असताना प्रकृतीने साथ न दिल्याने दुःखद निधन झाले आहे. वेदशास्त्र संपन्न किरण गुरु गोसावी मोगरेकर यांचे ते वडील होते प्राध्यापक डॉक्टर सुधाकर गोसावी यांचे ते लहान बंधू होते.

सलग पंधरा दिवस मृत्यूशी झुंज देत सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि मूल्यनिष्ठेचा वारसा जपणारा एक निखारा अखेर शांत झाला. माजलगाव येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी आलेले आरुण काका गोसावी साबळे हॉस्पिटल परिसरात रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झाले. डोक्याला जबर मार लागल्याने ते तत्काळ बेशुद्ध अवस्थेत गेले. प्राथमिक उपचारानंतर परभणी येथील खाजगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. पान २ वर

# संत भगवान बाबा शासकीय वसतिगृहासाठी २९ कोटींचा निधी मंजूर-आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

**ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींच्या शिक्षणाविषयीची आस्था वृद्धिंगत करून त्यांना पुढील शिक्षणासाठी सक्षम व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने संत भगवान बाबा वसतिगृह योजना सुरू केली आहे. स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची अखंड संधी मिळावी हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे आ.प्रकाश सोळंके यांनी सांगितले.**



त्या अनुषंगाने माजलगाव येथे संत भगवान बाबा शासकीय वसतिगृहासाठी २ व धारूर तालुक्यातील २ अशा एकूण ४ वसतिगृहांची राज्य शासनाकडे मागणी करण्यात आली होती.त्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात माजलगाव येथे मुलींसाठी १ आणि मुलांसाठी १ अशा २ वसतिगृहांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासाठी सुमारे २९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार यांनी ही कामे पूर्णत्वास नेण्याचा दिलेला शब्द अखेरीस पूर्णत्वास जात आहे,या योजनेला मान्यता दिल्याबद्दल ना. संजय सिरसाट (मंत्री, सामाजिक न्याय) पान २ वर

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियाना मध्ये जि.प. प्रा. शा. बाहेगव्हाणने प्रथम क्रमांक पटकावला

वडवणी । प्रतिनिधी



दि.१२ वडवणी तालुक्यात राबविण्यात आलेल्या ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान ३.०'' अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभियानात वडवणी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. काटेकोर मूल्यमापन प्रक्रियेनंतर बाहेगव्हाण शाळेची निवड प्रथम क्रमांकासाठी करण्यात आली.तालुकास्तरावरील निकाल जिल्हा परिषद शाळांमधून प्रथम क्रमांक: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण द्वितीय क्रमांक जि. प. प्रा. शा. कवडगाव बु. तृतीय क्रमांक: प्रा. शा. गहिनीनाथ नगर खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधून प्रथम क्रमांक अशोक माध्यमिक विद्यालय, चिंचाळा द्वितीय क्रमांक उपळी हायस्कूल, उपळी तृतीय क्रमांक भगवान बाबा माध्यमिक विद्यालय,चिंचवन. वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळेला प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शाळेच्या सर्व शिक्षकांनी शाळेच्या सुशोभीकरण, स्वच्छता, हरित परिसर, आकर्षक भिंतचित्रे, विविध शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थी सहभाग या सर्व बाबींमध्ये सातत्याने नियोजनबद्ध परिश्रम घेतले. या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख गणेश धाईतिडक, श्रीमती बडदे मॅडम, श्रीमती तारळकर मॅडम, श्रीमती सौंदरमल मॅडम, श्री भस्करे सर, श्री भुते पान २ वर

# स्त्री ही सर्जक आणि विश्वाची निर्माती-डॉ.राजेश इंगोले

## समाधान मानसोपचार रूग्णालय व्यसनमुक्ती केंद्रात कर्तबगार महिलांचा सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी



इंडियन मेडिकल असोसिएशन सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्य व इनरव्हील क्लब ऑफ अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने समाधान मानसोपचार रूग्णालय व्यसनमुक्ती केंद्र येथे राष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ तथा सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले व इनरव्हील क्लबच्या प्रा.सुरेखा खंडाळे शिरसाट, माजी मुख्याध्यापिका चंद्रकला देशमुख व संगीता नावंदर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रास्तविक करताना इनरव्हील क्लबच्या प्रा.सुरेखा खंडाळे शिरसाट यांनी १३ फेब्रुवारीच्या या खास दिवशी, आपण सर्वजण महान कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक आणि भारताची कोकिळा सरोजिनी नायडू यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय महिला दिन साजरा करत आहोत. हा दिवस केवळ त्यांच्या कर्तृत्वाला सन्मान देण्याचा नाही, तर आपल्या समाजातील महिलांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची आणि त्यांच्या योगदानाची ओळख करून देण्याचा दिवस आहे असे सांगितले. आपल्या अध्यक्षीय समारोप करताना डॉ.राजेश इंगोले यांनी सरोजिनी नायडू यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोलाची भूमिका बजावली.त्या केवळ एक प्रखर नेत्या नव्हत्या, तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्षा आणि उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल देखील बनल्या. त्यांची कविता आणि विचार आजही आपल्याला प्रेरित करतात. पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जुन्नरमध्ये राष्ट्रवादी एकत्रीकरणाचे पहिले पाऊल

## अतुल बेनके आणि अमोल कोल्हे यांचा एकत्र पुढे जाण्याचा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र .येण्याची जोरदार चर्चा सुरु आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पावर यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीने एकत्र काम करावे असा चर्चा सुरु आहे. अनेक नेत्यांनी तशी इच्छा देखील व्यक्त केली आहे. अजित पवार यांना देखील दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात असे वाटत होते, अशी माहिती नेत्यांनी दिली आहे. दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचं पहिलं पाऊल पुणे ज्ह्यिातील जुन्नरमध्ये पडलं आहे. मी आणि खासदार अमोल कोल्हे स्थानिक स्वराज संस्था एकत्रीत लढलो.,आम्ही सर्वांनी जुन्नर तालुक्याने ठरवले आहे की पुढे काय होईल माहिती नाही, पण जुन्नरमध्ये आम्ही दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित वाटचाल करणार आहोत अशी माहितची माजी आमदार अतुल बेनके यांनी दिली आहे.**

उपमुख्यमंत्री बनल्यानंतर सुनेत्रा पवारांनी पहिली बैठक घेतली ती पुण्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीत विजयी झालेल्या उमेदवारांसोबत. या बैठकीत सुनेत्रा पवारांनी विजयी उमेदवारांना मार्गदर्शन करताना आपल्याला अजित दादांचा कामाचा वारसा पुढे न्यायचा असल्याने सकारात्मक पद्धतीने काम करण्याचं आवाहन नवनिर्वाचित उमेदवारांना केलं. सुनेत्रा पवारांना यावेळी जुन्नर तालुक्यातील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी भेटले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अतुल बेनके यांनी राज्यात दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण होईल की नाही याबाबत आपल्याला माहिती नाही मात्र जुन्नर तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या आम्ही पदाधिकाऱ्यांनी इथुन पुढे एकत्रच रहायच ठरवलं आहे असं म्हटलंय. या भुमिकेला सुनेत्रा पवारांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा दावा अतुल बेनके यांनी केला आहे. मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाचे शपथ घेतली. अजितदादांच्या निधनानंतर जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक सामोरे गेलो. नेतृत्व




स्वीकारणं आणि कार्यकर्त्यांना घेऊन पुढे सुनेत्रा पवार यांना भेटलो. जुन्नरमधील प्रत्येक कार्यकर्त्यांच्या पाठीशी सुनेत्रा पवार उभे राहतील असा आम्हाला त्यांनी विश्वास दिल्याचे बेनके म्हणाले. जिजामाता सारखी चुणूक आम्हाला सुनेत्रा वहिनींमध्ये दिसल्याचे बेनके म्हणाले. अजित पवार यांचे विचार काम पुढे जात आहोत. अजित दादांचे प्रतिबिंब सुनेत्रा पवार यांच्यामध्ये बघून आम्ही पुढे जात आहोत असे बेनके म्हणाले. अजित पवार जसे जुन्नर तालुक्याला पाठबळ देत होते तसेच पाठबळ सुनेत्रा पवार देतील असे बेनके म्हणाले. आम्हाला जिल्हा परिषदमध्ये पद मिळावे अशी आमची इच्छा होती. मी आणि खासदार अमोल कोल्हे सागून आम्ही स्थानिक स्वराज संस्था एकत्रीत लढले आहे. आम्ही सर्वांनी जुन्नर तालुक्याने ठरवले आहे की पुढे काय होईल माहिती नाही पण जुन्नर मध्ये आम्ही दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित वाटचाल करणार आहोत. आता पुढची वाटचाल कशी करायची यांबाबत चर्चा झाली आहे. दादा नाहीत मग पुढे काय अशी चर्चा झाल्याचे बेनके म्हणाले. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक जुन्नर तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसनी एकत्रित येऊन लढवली होती. अजित पवार आणि खासदार अमोल कोल्हे यांनी त्यासाठी तयारी दर्शविली होती. फक्त घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवायच आम्ही ठरवलं होतं. दोन पक्षांतील मतांची विभागणी आम्हांला नको होती असे बेनके म्हणाले. निवडून आलेल्या सदस्यांसह आम्ही आज सुनेत्रा पवारांना भेटलो. यावेळी घड्याळ आणि तुतारी या दोन्ही पक्षांचे तालुकाध्यक्ष देखील उपस्थित होते असे बेनके म्हणाले. सुनेत्रा वहिनींना आम्ही संगितले की राज्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलिनीकरण होईल की नाही माहीत नाही पण जुन्नर तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या आम्हा सर्व नेत्यांनी एकत्रित रहायचं ठरवलं आहे. यावर सुनेत्रा पवारांनी चांगली गोष्ट आहे असं म्हणत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्याचे बेनके म्हणाले.

# पुणे मध्ये संतापजनक घटना; दारूच्या नशेत मुलाकडून वडिलांना जाळण्याचा प्रकार, उपचारादरम्यान मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

**पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. दारूच्या नशेत मुलाने आपल्या वडिलांनाच (झींपश उीळाश छ्शुाी) पेटवून देऊन खून केल्याचा संतापजनक प्रकार दांडेकर पूल परिसरात घडला आहे. यासंदर्भात पर्वती पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण होते.**

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रवींद्र उद्धव भालेराव (६१, रा. सर्व्हे क्र. १३० दांडेकर पूल) असे मृताचे नाव आहे. त्यांचा खून केल्याच्या आरोपावरून त्यांचा मुलगा सागर (२८) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भालेराव सुतारकाम करून आपलं घर चालवक होते. त्यांचा मुलगा सागर हा देखील छोटी मोठी कामे करायचा. दोघांनाही दारूचे व्यसन होते. दारूच्या नशेत असताना शनिवारी (दि. ७) दोघांमध्ये वाद झाला. त्यावेळी रागाच्या भरात सागरने वडिलांच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिले. या घटनेत भालेराव गंभीर रीत्या भाजले गेले. आग भडकल्याने सागरने आग आटोक्यात आणून त्यांना ससून रुग्णालयात दाखल केले. ते पन्नास टक्के भाजले असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले. तेथे



उपचार सुरू असताना मंगळवारी (दि. ११) मध्यरात्री (झींपश उीळाश छ्शुाी) भालेराव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी पर्वती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सुभाष महाले पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेनंतर पर्वती पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून परिसरातील नागरिकांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. प्राथमिक तपासात घरगुती वादातूनच हा प्रकार घडल्याचे समोर आले असले तरी पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. आरोपी सागरला ताब्यात घेण्यात आले असून त्याची कसून चौकशी केली जात आहे. घटनेच्या वेळी तोही मद्यधुंद अवस्थेत होता, त्याचवेळी बाप लेकामध्ये वाद झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, वडिलांवर पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याच्या या घटनेमुळे दांडेकर पूल परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शेजाऱ्यांनीही या कुटुंबात वारंवार वाद होत असल्याचे सांगितले आहे. व्यसनाधीनतेतून कुटुंबातील नातेसंबंध कसे ताणले जातात आणि त्यातून टोकाचे प्रकार कसे घडतात, याचे हे धक्कादायक उदाहरण असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# चऱ्होली एसटीपी जागेचा टीडीआर वाद ५९ कोटींचा मोबदला थेट २१३ कोटींवर

पिंपरी । प्रतिनिधी

चऱ्होली येथील एक खासगी जागा मैलासांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया केंद्रासाठी (एसटीपी) सन २००८ ला ताब्यात घेण्यात आली. त्याच्या मोबदल्यात टीडीआर देण्याचा निर्णय तब्बल १७ वर्षांनंतर म्हणजे ऑगस्ट २०२५ ला घेण्यात आला. मात्र, रेडिरेकनरचा ६७३ रुपये चौरस फूट असलेला दर तब्बल १ हजार २१० रुपये चौरस फूट एवढा करून ५९ कोटी रुपयांऐवजी २१३ कोटी रुपयांचा मोबदला त्या माध्यमातून दिला गेला. महापालिकेच्या नगर रचना विभागाच्या टीडीआर वाटपातील या आर्थिक हितसंबंधांच्या व्यवहारावरून शंका उपस्थित केली जात आहे.


महापालिकेने सन २००८ ला चऱ्होली येथील सर्व्हे क्रमांक ३३ येथील ११ लाख ७४ हजार ६२ चौरस फूट जागेवर एसटीपीचे आरक्षण टाकण्यात आले. त्या जागेचा मोबदला भूसंपादन नियमानुसार घेणार नसून, तो टीडीआर स्वरूपात घेऊ असे जागा मालकाने लेखी दिले होते. त्या नियमाकडे महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष





करण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. त्या जागेच्या टीडीआर स्वरूपात मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला. मोबदला देताना टीडीआर देताना रेडिरेकनर दरात वाढ करण्यात आली. मुद्रांक शुल्क महानिरीक्षकांनी चर्होली येथील जागेचा ६७३ रुपये प्रतिचौरस फूट असलेला रेडिरेकनरचा दर तब्बल १ हजार २१० रुपये प्रतिचौरस फूट इतका वाढवला. तो निर्णय १८ ऑगस्ट २०२५ रोजी घेण्यात आला. तो निर्णय एका राजकीय व्यक्तीमुळे घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्या निर्णयात तसे नमूद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.त्या निर्णयाच्या आधारे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या टीडीआर समितीने जागामालकाला ११ लाख ७४ हजार ६२ स्केअर फूट जागेचा टीडीआर देण्याचा निर्णय घेतला. पूर्वी असलेला ६७३ रुपये चौरस फूट दराऐवजी १ हजार २१० रुपये चौरस फूट दराने मोबदला दिला गेला. त्या वाढीव दराने संबंधित जागामालकास टीडीआर देण्यात आला. त्यामुळे त्या जागेचा पूर्वी असलेला ५९ कोटी १७ लाख २७ हजार २४८ रुपयांचा मोबदला नव्या वाढीव दरामुळे २१३ कोटी ९ लाख २२ हजार ५३० रुपयांवर पोहोचला आहे. त्यामुळे जागामालकास तब्बल १५४ कोटी रुपयांचा अधिकचा फायदा झाला आहे. चऱ्होली येथील ठराविक जागेचा रेडीरेकनर दर वाढवून महापालिकेकडून वाढीव दराने मोबदला दिल्या गेल्याबद्दल तसेच, सन २००८ मध्ये जागा ताब्यात घेतली असताना १७ वर्षांनंतर आजच्या दराने टीडीआर देण्यात आल्याने नगर रचना विभागाच्या हेतूबाबत शंका उपस्थित केली जात आहे. या वाढीव टीडीआर वाटप प्रकरणावरून महापालिका वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली आहे. त्या प्रकरणासंदर्भात सर्व व्यवहार आमचे वकील पाहतात, ते तुमच्याशी बोलतील, असे जागामालक नीलेश कलाटे यांनी सांगितले.

# दापोडी-फुगेवाडी प्रवेशद्वारांवर वाहतूक कोंडी; नागरिक त्रस्त



पुणे । प्रतिनिधी

**जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील दापोडी आणि फुगेवाडी प्रवेशद्वार परिसरात गेल्या काही महिन्यांपासून वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. फुगेवाडी व कासारवाडीतील अरुंद अंतर्गत रस्ते तसेच महामार्गाबाहेर पडताच वाहनांच्या रांगा लागणे, यामुळे स्थानिक नागरिक व वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.**

परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. दापोडी, फुगेवाडी आणि कासारवाडी ही उपनगरे महामार्ग लगत असल्याने येथे वाहनांची वर्दळ असते. मात्र नियोजनाच्या अभावामुळे आणि विकासकामांना होणाऱ्या विलंबामुळे हा परिसर वाहतूक कोंडीने त्रस्त झाला आहे. दापोडी येथील पेट्रोल, डिझेल व सीएनजी पंपावर गॅस भरण्यासाठी अनेक वाहनचालक उलटचा दिशेने येतात. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुकीवर परिणाम होतो. तसेच दापोडी मेट्रोस्थानक परिसरात काही प्रवासी रस्ता ओलांडण्याऐवजी विरुद्ध दिशेने प्रवास करत असल्याचे चित्र दिसते. एका हॉटेल परिसरात महामार्गालगत अनधिकृत पार्किंग होत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. याशिवाय दापोडी, फुगेवाडी व कासारवाडी रस्त्यावर अनेक दिवसांपासून उभी असलेली बंद वाहनेही वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. परिणामी दापोडी रेल्वे स्थानकापासून फुगेवाडी व कासारवाडीपर्यंत वाहनांच्या रांगा लागत असून, प्रवासाचा खोळंबा होत आहे. दरम्यान बीआरटी महामार्गावर रस्त्यांची कामे गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असून ती अद्याप पूर्ण झालेली नाहीत. अर्धवट कामांमुळे महामार्गावरील रस्ता अरुंद झाला आहे. खोदलेले रस्ते राडारोडा व धुळीमुळे नागरिक व व्यावसायिकांना अडचणी येत आहेत. ही कामे लवकर पूर्ण करावीत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. दापोडी येथील पेट्रोल, डिझेल व सीएनजी पंपावर गॅस भरण्यासाठी वाहनचालक विरुद्ध दिशेने येतात. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुकीवर परिणाम होतो. तसेच मेट्रो स्थानक परिसरात काही प्रवासी रस्ता ओलांडणे ऐवजी विरुद्ध दिशेने जात असल्याचे चित्र दिसते. हॉटेल परिसरात महामार्गालगत अनधिकृत पार्किंग होत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. रस्त्यावरील उभी असलेली बंद वाहने हे वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. यावर वाहतूक प्रशासनाने कारवाई करणे गरजेचे आहे.

# नियोजन समिती बैठकीत 'दादां'ची उणीव!

## पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज

पुणे । प्रतिनिधी

**जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत अधिकाऱ्यांचे कौतुक करणारे, कामात दिरंगाई झाल्यास किंवा अधिकाऱ्याची तक्रार येताच त्यांचे कान टोचणारे, बैठकीत मिश्लिकपणे उत्तरे देणाऱ्या अजितदादा पवार यांची उणिव जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जाणवली.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधानभवन येथे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री सुनेत्रा पवार होत्या.**

यावेळी जिल्ह्यातील खासदार, आमदार आदींसह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील पाटील म्हणाले की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या कार्यपद्धतीतील सुक्ष्म अभ्यासातून भविष्याचा वेध घेण्याचा आग्रह करणारे व्यक्तीमत्व होते. राज्याच्या प्रगतीत त्यांचे फार मोठे योगदान होते. जिल्हा नियोजन समितीची बैठक खऱ्याअर्थाने वेळेत सुरू करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे, अशा शब्दात पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने राज्यासह पुणे जिल्ह्याचे नुकसान झाले आहे. राज्यासह पुणे जिल्ह्याची प्रगती करुन सर्व क्षेत्रात पुढे जावे हा त्यांचा मानस होता, त्यादृष्टीने सर्वांना सोबत घेवून त्यांना न्याय देण्याची त्यांची भुमिका होती. पायाभूत विकासाच्यादृष्टीने त्याचे आदर्श, विचार, कार्यपद्धती डोळ्यासमोर ठेवून तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचा प्रगतीचा आलेख पुढे नेण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करुया, अशा शब्दांत भरणे यांनी आपले विचार व्यक्त केले.विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच विरोधी पक्षनेता अशा विविध भुमिकेत आपली जबाबदारी पार पाडली, त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या समन्वयाने कामे करीत असतांना विविध विकास मार्गी लागली. पायाभूत विकासाचे प्रकल्पाचे सादरीकरण समजून घ्यायचे, त्यामध्ये आवश्यतेनुसार बदल सूचवायचे. गोरगरीब सामान्य नागरिकांचे प्रश्न तळमळीने सोडवून त्यांना न्याय देण्याची त्यांची भुमिका होती.राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम करिता जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या उपस्थितीत विधानभवन येथील झुंबर सभागृहात विविध बैठकीत आयोजित करण्यात आल्या.




# भीमाशंकर मंदिर महाशिवरात्रीला भाविकांसाठी बंद; प्रशासनाचे सहकार्याचे आवाहन

घोडेगाव। प्रतिनिधी

**विकास आराखड्यांतर्गत मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर महाशिवरात्रीला (दि. १२ ते दि. १८) या कालावधीत भाविकांसाठी बंद राहणार आहे. भाविकांनी याबाबत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.**

भीमाशंकर मंदिर विकास आराखड्यांतर्गत सभामंडप, पायरी मार्ग, वाहनतळ, भाविक सुविधा केंद्र, स्नानगृहे, शौचालये, पोलिस ठाणे व विश्रामगृह यांसारखी मोठी पायाभूत कामे वेगात सुरू आहेत. मंदिरासमोरचा जुना सभामंडप पूर्णपणे हटविण्यात आल्याने




बांधकाम साहित्य, मोठे दगड व यंत्रसामग्री परिसरात आहे. ही सामग्री हलविणे शक्य नसल्याने महाशिवरात्रीच्या प्रचंड गर्दीत दर्शनासाठी मंदिर उघडणे धोकादायक ठरेल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. मंदिर तीन महिन्यांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय झाला होता.या कालावधीत महाशिवरात्र येत असल्याने सुरुवातीला सात दिवस उघडे ठेवण्याचा विचार होता. परंतु, सध्या सुरू असलेल्या कामांमुळे व भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मंदिर नित्यदर्शनासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी डुडी यांनी भाविकांना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# कोरेगाव भीमा येथे परप्रांतीय युवकाची हत्या; ममता बॅनर्जी यांचा संताप

पुणे । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील कोरेगाव भीमा येथे अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने हल्ला करून परप्रांतीय युवकाची हत्या केल्याची घटना घडली आहे. सुकेन महातो (वय ३०, मूळ रा. पश्चिम बंगाल) असे मृत युवकाचे नाव आहे. आपले घर या हॉटेलच्या पाठीमागे युवकाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच शिक्रापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. तपासासाठी श्वान पथक व अंगुलीमुद्रा पथक पाचारण करण्यात आले आहे. याप्रकरणी तुळशीराम महातो यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात इसमांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास





शिक्रापूर पोलीस करीत आहेत. कोरेगाव भीमा येथे झालेल्या खून प्रकरणी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोशल मिडीयावरती पोस्ट करत नाराजी व्यक्त केली आहे.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना, परप्रांतीयां विरोधातील द्वेषाचे वातावरण निर्माण करून निरपराध लोकांना लक्ष्य बनवले जात असल्याचे नमूद केले. तसेच आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर व आदर्श शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पश्चिम बंगालमधील पुरुलिया जिल्ह्यातील बंडवान येथील २४ वर्षीय स्थलांतरित कामगार सुखेन महतो यांच्या झालेल्या निर्घृण हत्येमुळे मन सुन्न झाले आहे. आपल्या कुटुंबाचा एकमेव कमावता सदस्य असलेल्या या तरुणाची अशी क्रूर हत्या होणे अत्यंत संतापजनक आणि वेदनादायक आहे. ही घटना साधी गुन्हेगारी नसून द्वेषातून घडवलेला गंभीर गुन्हा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. एका तरुणाला त्याची भाषा, ओळख आणि मूळ यामुळे लक्ष्य केले गेले, त्याला छळण्यात आले आणि त्याची हत्या करण्यात आली, हे अत्यंत अमानुष आहे. समाजात वाढत चाललेल्या परप्रांतीयांविषयीच्या द्वेषपूर्ण वातावरणाचे हे परिणाम असल्याची टीका करण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सुखेन महतो यांच्या कुटुंबीयांना या दुःखद प्रसंगी न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असा विश्वास पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केला आहे.